# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक २५ जुलै, २०१७ / श्रावण ३, १९३९ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **गृहनिर्माण मंत्री** | |
| **(३)** | **कामगार, कौशल्य विकास, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ६४**

---

### नवी मुंबईतील भूखंड सिडकोच्या तत्कालीन अधिका-यांनी व्हिनस सहकारी गृहनिर्माण संस्थेला बेकायदेशीररित्या हस्तांतरीत केल्याबाबत

**(१) * ८५०८२ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील, सीवुड सेक्टर ५८- ए, प्लॉट क्र.८ हा रुपये २० कोटी किंमतीचा भूखंड डॉ. डी.के. शंकरन समितीपासून हेतूपूर्वक लपवून सिडकोचे तत्कालीन पणन व्यवस्थापक यांनी केवळ ४ कोटी रुपये किंमतीला विक्री करुन सिडकोचे सुमारे १६ कोटी रुपयांचे आर्थिक नुकसान केल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉ.डी.के. शंकरन समितीने एकूण ८२ भूखंड घोटाळयांपैकी ५० भूखंड गैरव्यवहाराची चौकशी करुन कारवाई केली असून उर्वरित ३२ भूखंड प्रकरणांची अद्यापही चौकशी न करता प्रकरण संगनमताने दडपण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त, सीवुड सेक्टर ५८- ए, प्लॉट क्र. ८, मधील, भूखंड 'व्हिनस सहकारी गृहनिर्माण संस्थेला' बेकायदा हस्तांतरीत केल्याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच उक्त भूखंड ताब्यात घेण्याबाबत तसेच शंकरन समितीच्या उर्वरित भूखंड प्रकरणाबाबत सिडको तथा शासनातर्फे करण्यात आलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) सिडको महामंडळाचे तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक यांच्या दि.२६.५.२००३ ते दि.२८.१२.२००४ या कार्यकाळात झालेल्या भूखंड वाटपाची चौकशी करण्यासाठी शासनाने डॉ.शंकरन समिती गठीत केली होती.

व्हिनस सहकारी गृहनिर्माण संस्थेस करावयाच्या भूखंडवाटपास तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक यांनी दि.२५.१२.२००४ रोजी मान्यता दिली होती. तथापि, भूखंड वाटपाचा दर निश्चित करुन सदर संस्थेस दि.२४.१.२००५ रोजी भूखंडाचे वाटपपत्र देण्यात आल्याने सदर भूखंडाची समितीमार्फत चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. डॉ.शंकरन समितीने एकूण ८३ प्रकरणांची तपासणी केली. समितीच्या अहवालाप्रमाणे ५० प्रकरणांत गंभीर अनियमितता आढळून आली. ११ प्रकरणे संशयास्पद होती, २२ प्रकरणांचे वाटप योग्य असल्याचे आढळून आले.
(३) व (४) भूखंड वाटपासाठी आकारावयाच्या दराबाबत सिडकोचे निश्चित धोरण असताना, व्हिनस सहकारी गृहनिर्माण संस्थेस भूखंड वाटप करताना धोरणास अपवाद करुन काही सवलत देवून सिडकोचे आर्थिक नुकसान झाले किंवा कसे याबाबतची चौकशी अप्पर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग यांचे मार्फत करण्यात आली आहे. राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडून गृह विभागास दि.२९.५.२०१३ रोजी अहवाल सादर केला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने गृह विभागाशी विचारविनिमय करुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## राज्यातील सायबर गुन्ह्यांवर प्रतिबंध घालण्यासाठी राबविण्यात येत असलेला सायबर सुरक्षा प्रकल्प

**(२) * ९०१०५ श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढत असून गत तीन वर्षात राज्यात ५८६१ सायबर गुन्हे दाखल झालेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याला प्रतिबंध करण्याकरिता सायबर सुरक्षेसाठी राज्य शासनाकडून ८३७ कोटी रुपये खर्चाचा प्रकल्प राबविण्याचा निर्णय माहे एप्रिल, २०१७ च्या पहिल्या आठवडयामध्ये वा त्या दरम्यान घेण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकल्पाचे स्वरुप काय आहे व सदर प्रकल्प किती कालावधीत कार्यान्वित करण्यात येणार आहे,

(४) राज्यात सायबर गुन्हयांचे प्रमाण वाढत असल्यामुळे उक्त प्रकल्प कार्यान्वित होईपर्यंत कोणती परिणामकारक प्रतिबंधात्मक उपाययोजना शासनाकडून राबविण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) राज्यात सन २०१४ ते २०१७ (माहे मे पर्यंत) ५७३२ इतक्या सायबर गुन्ह्यांची नोंद झाली आहे.

(२) सायबर सुरक्षा प्रकल्पाकरिता पुढील पाच वर्षाकरिता रुपये ८३७,८६,०७,३५०/- इतकी रक्कम खर्च करण्यास दि.०४.०६.२०१६ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(३), (४) व (५) सायबर गुन्ह्यासंबंधात गुन्हयांचा शोध अधिक परिणामकारक व त्यात सुसुत्रता आणण्याकरिता सायबर कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. प्रकल्पांतर्गत राज्यात ४७ सायबर लॅबची स्थापना करण्यात आली असून त्यांना पोलीस ठाण्याचा दर्जा देण्यात आला आहे. या सायबर लॅबमध्ये अत्याधुनिक तपास यंत्रे, साधनसामुग्री तसेच इतर उपकरणे यांची खरेदी व पुरवठा प्रक्रिया सुरु आहे.

प्रकल्पाकरिता सिस्टिम इंटिग्रेटर म्हणून सी-डॅक या संस्थेस नेमण्यात आले आहे. सदर प्रकल्पांतर्गत तंत्रज्ञानयुक्त गुन्हे अन्वेषण केंद्र, तंत्रज्ञानयुक्त पोलिसिंग व विश्लेषण केंद्र, सायबर प्रशिक्षण केंद्र, सुरक्षा व्यवहार केंद्र, डाटा सेंटर इत्यादींचा समावेश आहे.

-----------------

## वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्समध्ये स्पाईस ॲण्ड ग्रेन्स या परदेशी कंपनीने केलेले अनधिकृत बांधकाम

**(३) * ८५४८६ श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स मधील ‘वोक एक्सप्रेस’ हे चायनिज रेस्टॉरंट बेकायदा असून ‘स्पाईस ॲण्ड ग्रेन्स’ या परदेशी कंपनीला हे फुडकोर्ट चालविण्यासाठी भाडेतत्वावर दिल्यानंतर या कंपनीने तेथे केलेले अनधिकृत बांधकाम पाडून टाकण्याबाबत एमएमआरडीएने नोटीस देऊनही सदर बेकायदेशीर बांधकाम पाडण्यास मा. नगरविकास राज्यमंत्री यांनी स्थगिती दिल्याची बाब दिनांक ७ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एमएमआरडीएने एमआरटीपी कायद्यानुसार सदर कंपनीला नोटीस बजावल्यानंतर नगरविकास राज्यमंत्री यांनी एमएमआरडीएच्या प्रस्तावित कारवाईला स्थगिती देऊन बेकायदेशीर बांधकामाला सहकार्य करण्याचे सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, एमएमआरडीएने बेकायदेशीर बांधकामाबाबत स्पाईस ॲण्ड ग्रेन्स कंपनीला दिलेली नोटीस चुकीची असल्याबद्दल राज्यमंत्री यांनी कोणत्या कलमान्वये सदर बांधकाम पाडण्यास स्थगिती दिली,

(४) असल्यास, सदर बेकायदेशीर बांधकाम किती दिवसात निष्कासित करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ते (३) प्रस्तूत प्रकरणी स्पाईस अॅण्ड ग्रेन्स ओव्हरसी प्रायव्हेट लिमिटेड यांनी वांद्रे कुर्ला संकुलातील जीएन ब्लॉकमधील, भूखंड क्र.सी ५ या मिळकतीमधील अर्बन फुड प्लाझा या इमारतीमधील बांधकामासंदर्भात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने बजावलेल्या नोटीसीस स्थगिती देण्याची विनंती दिनांक ९.८.२०१६ रोजी केलेली होती. त्यावर अपिलिय प्राधिकरण यांनी सुनावणी होईपर्यंत स्थगिती देणेचे शेरे नोंदविले होते. तथापि याबाबत कायदेशीर तरतूदी अपिलीय प्राधिकरणास अवगत करण्यात येवून प्रकरणी कोणतेही स्थगन आदेश शासन नगरविकास विभागाकडून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास कळविले नसल्याचे, महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना कळवून नियमानुसार उचित कार्यवाही करणेच्या सूचना दिनांक २३.१२.२०१६ रोजी देणेत आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे स्पाईस ग्रेन्स लिमिटेड यांचा अर्ज दिनांक १० जानेवारी, २०१७ रोजी निकालात काढणेत येत असलेबाबत त्यांनाही कळविण्यात आलेले आहे. शासनाकडून कोणतेही स्थगनादेश सदर प्रकरणी देणेत आलेले नाहीत.
(४) व (५) वोक एक्प्रेस हया चायनीस रेस्टॉरंट कंपनीने फुडकोर्ट इमारतीच्या तळमजल्यावर भाडेतत्वावर दिलेल्या गाळयामध्ये केलेले काचेच्या भिंतीचे बांधकाम त्यांनी स्वत: निष्कासित केलेले आहे. परंतु गाळयासमोरील व्हरांडा (ओटा) याचा वापर ते रेस्टॉरंटच्या बैठक व्यवस्थेसाठी करत असून ते काढण्याबद्दल प्राधिकरणामार्फत कारवाई सुरु आहे.

-----------------

## मुंबई शहरातील वरळी, नायगांव, डिलाई रोड येथील बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाबाबत

**(४) * ८४९३८ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरांतील वरळी, नायगांव, डिलाई रोड येथील १९४ बीडीडी चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पाचे भूमिपूजन मा.मुख्यमंत्री यांच्या हस्ते दिनांक २२ एप्रिल, २०१७ रोजी करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाचे काम कोणकोणत्या विकासक कंपनीला देण्यात आले आहे व तेथील रहिवाशांना किती कारपेटची सदनिका देण्यात येणार आहे,
(३) असल्यास, याबाबत रहिवाशांबरोबर पुनर्विकासाबाबत करारनामा करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रहिवाशांबरोबर कोणतेही करारनामा न केल्यामुळे रहिवाशी संघटनेने शासनाच्या धोरणाबाबत तीव्र विरोध करुन आपल्या मागण्याचे निवेदन मा.मुख्यमंत्री, गृहनिर्माण मंत्री यांच्याकडे माहे एप्रिल, २०१७ रोजीच्या सुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या निवेदनाचे स्वरुप काय आहे व याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) व (२) बी.डी.डी. चाळीच्या पुनर्विकास प्रकल्पाचे भूमिपूजन मा. मुख्यमंत्री यांच्या हस्ते दि.२२.०४.२०१७ रोजी करण्यात आले आहे.

नायगाव व ना. म. जोशी मार्ग येथील बी.डी.डी चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पाच्या बांधकामासाठी बांधकाम कंत्राटदार नियुक्तीकरिता म्हाडामार्फत जागतिक निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार नायगाव येथील पुनर्विकास प्रकल्पाच्या बांधकामासाठी मे. लार्सन ॲन्ड टुब्रो लि. आणि ना. म. जोशी मार्ग येथील पुनर्विकास प्रकल्पाच्या बांधकामासाठी मे. शापुरजी पालनजी ॲन्ड को. प्रा. लि. या बांधकाम कंत्राटदारांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच वरळी येथील बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पाचे बांधकामासाठी म्हाडामार्फत दि.०३.०४.२०१७ रोजी जागतिक निविदा मागविण्यात आल्या आहेत. तसेच विनियम ३३ (९) (ब) मधील तरतुदीनुसार सदर चाळीतील पात्र रहिवाशांना ४६.४५ चौ. मी. चटई क्षेत्रफळाची पुनर्वसन सदनिका मालकी तत्वावर देण्यात येणार आहे.

(३), (४) व (५) बी.डी.डी. चाळीतील रहिवाश्यांची पात्रता ठरविण्याच्या अनुषंगाने दि.२८.०६.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये आवश्यक मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर शासन निर्णय तसेच बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम ३३ (९) (ब) मधील तरतुदींच्या आधारे सदर चाळीतील रहिवाश्यांची पात्रता ठरविण्याची कार्यवाही शासनाने नेमलेल्या सक्षम प्राधिका-यांकडुन करण्यात येत आहे. सदरहू कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर म्हाडाकडुन पात्र भाडेकरुंसोबत करारनामा करण्यात येणार आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बी.व्ही.जी. इंडिया या कंपनीने कंत्राटातील अटींचे पालन न केल्याबाबत**

**(५) * ८४९५९ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर सुधार प्रन्यासने सन २०१२-२०१३ आणि सन २०१३-१४ या कालावधीमध्ये १ लाख ६० हजार झाडे लावण्याचे कंत्राट पुण्यातील बी.व्ही.जी. इंडिया (भारत विकास प्रतिष्ठान) या कंपनीला देऊन १९ कोटी ५२ लाख ८४ हजार रूपये अदा केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वृक्षरोपणासह सर्व झाडे जिवंत ठेवण्याची अट या करारात असतांनाही यातील जवळपास एक लाख झाडे गायब झाली असून सदर कंत्राटदारास करोडो रूपयांचे वेतन देण्यात आले असल्याचे दिनांक १५ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय. हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

महालेखाकार नागपूर यांनी सन २०११ ते २०१४ या वर्षीच्या लेखापरिक्षणात याबाबत आक्षेप घेऊन त्याबाबत नागपूर सुधार प्रन्यासला दिनांक २२/०५/२०१५ च्या पत्रान्वये कळविले आहे.

या प्रकरणी नागपूर सुधार प्रन्यासकडून करण्यात आलेल्या चौकशीअंती व प्रत्यक्ष पहाणीअंती ५१ टक्के झाडे जिवंत असल्याचे आढळून आले आहे.

(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी लोकप्रतिनिधीकडून प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने, नागपूर सुधार प्रन्यासने ७ कर्मचा-यांना निलंबित केले आहे.

तसेच इतर २५ अधिकारी / कर्मचारी यांचे खुलासे मागविण्यात आले असून, ते प्राप्त झाल्यानंतर, नियमानुसार पुढील कार्यवाही नागपूर सुधार प्रन्यासकडून करण्यात येणार आहे.

तथापि, कंत्राटदाराकडून जास्तीत जास्त झाडांची पुर्नलागवड करुन घेण्याच्या अनुषंगाने, चालू पावसाळ्यात कंपनीकडून प्रथम टप्प्यात १०,००० झाडे लावण्याचे कंपनीने मान्य केले आहे.

असे असले तरी, कंत्राटातील अटींचे पालन झाले नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असल्याने, अटी व शर्ती भंगाबाबत संबंधितांविरुध्द कारवाई करण्याबाबत सभापती, नागपूर सुधार प्रन्यास यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

-----------------

**जळगाव नगरपालिकेत घरकुल योजनेसह राबविलेल्या विविध योजनांमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(६) * ८९९८२ श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव नगरपालिकेने घरकुल योजनेसह राबविलेल्या विविध योजनांमध्ये गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारींवरुन गुन्हे दाखल केले असून या प्रकरणी शासनाने तत्कालीन ३ मुख्याधिकाऱ्यांची चौकशी सुरु केल्याची बाब दिनांक १ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चौकशी अहवाल सादर करण्यात आला आहे काय, त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) • जळगाव नगरपरिषदेतील घरकुल घोटाळा, वाघूर पाणीपुरवठा प्रकल्प अनियमितता, अनियमित पदोन्नत्या इ. बाबत तत्कालीन ३ मुख्याधिकाऱ्यांवर कारणे दाखवा नोटीसचे ज्ञापन यापूर्वी बजावण्यात आले होते.

• यातील एका मुख्याधिकाऱ्यावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून गुन्हा दाखल करण्यात आला होता व त्यावर अभियोग दाखल करण्यास शासनाकडून सन २०१२ अखेरीस मान्यता देण्यात आली होती.

• त्यानुसार सदर प्रकरणी न्यायालयीन कार्यवाही सुरु आहे. तसेच, सदर ३ मुख्याधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास आयुक्त, जळगाव महानगरपालिका यांचेकडून जून, २०१७ मध्ये प्राप्त झाला असून त्यानुसार विभागीय चौकशी आदेशित करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उमरेड (जि.नागपूर) येथील नगर अभियंत्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केल्याबाबत

**(७) * ९१२८७ श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर यांच्या पथकाने ठेकेदाराने दिलेल्या तक्रारीनुसार नगर पंचायत उमरेड (जि. नागपुर) येथील नगर अभियंता श्री.रविंद्र गोविंदवार यांना दिनांक २७ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास लाच स्वीकारतांना अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नगर अभियंत्याने पदाचा गैरवापर करून सन १९८६ ते २०१४ या कालावधीत नातेवाईकांच्या नावे तसेच भागीदारीत रूपये १०० ते १५० कोटींची अमाप संपत्ती जमा केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर अभियंत्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून श्री. गोविंदवार यांच्या अपसंपदेबाबत गोपनीय पडताळणी सुरू आहे.

-----------------

## राज्याच्या आदिवासी विकास खात्याचे उपायुक्त व अतिरिक्त आयुक्त यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेली अटक

**(८) * ८४९९३ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या आदिवासी विकास खात्याचे उपायुक्त किरण माळी व अतिरिक्त आयुक्त मिलिंद गवादे यांना १२ लाख रुपयाची लाच घेताना पालघर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडल्याचे दिनांक १६ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाण्यातील आदिवासी विकास विभागातील १२ कर्मचाऱ्यांकडून अधिक्षक पदावर पदावन्नत न करण्यासाठी सदर लाच मागण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदरील सनदी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) आलोसे मिलिंद भगवान गवादे व आलोसे किरण सुखलाल माळी यांच्याविरुध्द वागळे इस्टेट पो. स्टे.येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ तील कलमान्वये दि.१६.०४.२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयात त्यांना त्याचदिवशी अटक करुन मा. विशेष न्यायालय ठाणे येथे हजर केले असुन सदर गुन्हयाचा तपास सुरु आहे.

(४) आलोसे गवादे व आलोसे माळी यांना शासनाने तात्काळ निलंबीत केले आहे.

(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## मुख्याधिकारी, पालघर नगरपरिषद यांनी ठेकेदाराशी संगनमत करुन गैरव्यवहार केल्याबाबत

**(९) * ८८९२५ श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर नगरपरिषदेतील मुख्याधिकारी यांनी मनुष्यबळ ठेकेदाराशी संगनमत करुन गैरमार्गाने मनुष्यबळाचा ठेका देऊन दोन कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कमेचा गैरव्यवहार केल्याचे दिनांक ११ मार्च, २०१७ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठेका बनावट कागदपत्रे सादर करुन देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार भ्रष्ट अधिकारी व ठेकेदार यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) पालघर नगरपरिषदेने ई-निविदा पध्दतीने निवड केलेल्या अभिकर्त्याच्या विरोधात जिल्हाधिकारी,पालघर व मुख्याधिकारी, पालघर नगरपरिषद यांच्याकडे अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, ही वस्तूस्थिती आहे.

(३) जिल्हाधिकारी, पालघर यांनी त्यांच्याकडे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने यापूर्वीच दिनांक १०/०२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये संचालक निधी लेखा परिक्षा, कोंकण भवन यांना सदर बाबीचे विशेष लेखा परिक्षण करणेबाबत निर्देश दिले आहेत. त्यानुसार सद्यस्थितीत लेखापरिक्षणाची कार्यवाही सूरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या 'थीम पार्क' उभारण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत

**(१०) * ८४९१६ श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महालक्ष्मी (मुंबई) येथील रेसकोर्सच्या भूखंडाबाबत रॉयल वेस्टर्न टर्फ क्लब सोबत महापालिकेचा असलेला भाडेकरार सन २०१३ मध्ये संपुष्टात आला असून

सदरहु रेसकोर्सबाबतच्या महत्वाच्या कागदपत्रांच्या नोंदी गेल्या दीड वर्षांपासून शासनाच्या भूमी अभिलेख विभागाला सापडत नसल्याची धक्कादायक बाब माहे मे, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महालक्ष्मी (मुंबई) येथील रेसकोर्स आणि वेलिंग्टन क्लबसाठी देण्यात आलेल्या मोठ्या भुखंडांना भाडेपट्टा नुतनीकरणाच्या प्रक्रियेतून मुंबई महानगरपालिकेने वगळले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भाडेतत्वावर असलेल्या, 'अनुसूचि डब्ल्यू' मध्ये समाविष्ट केलेल्या मुंबई महालक्ष्मी रेसकोर्सचा, भाडेपट्टा संपुष्टात आलेला भूखंड भाडेपट्टयाने न देता त्यावर आंतरराष्ट्रीय दर्जाचे, 'थीम पार्क' उभारण्याच्या मुंबई महापालिकेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावास शासनाने मान्यता दयावी याकरीता लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री महोदयांना दिनांक २२ मार्च, २०१७ रोजी लेखी निवदेन दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) अनुसूची "डब्ल्यू" मध्ये समाविष्ट केलेल्या भूभागाच्या नुतनीकरणाचे सविस्तर आदेश दिनांक १५.०३.२०१७ रोजी काढण्यात आले आहेत.

तसेच, महालक्ष्मी रेसकोर्स, विविध जिमखाने व तत्सम भुभागाच्या भाडेपट्टयाच्या रकमेचे दर, त्याची आकारणी व परिगणना याबाबतचे आदेश स्वतंत्रपणे काढण्यात येणार आहेत.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) सदर निवेदनाच्या तसेच, या ठिकाणी वॉर मेमोरिअल उभारण्याबाबत प्राप्त झालेल्या निवेदनाच्या अनुषंगाने तपासणी करुन योग्य ती कार्यवाही करण्यात येणार आहे.

-----------------

**वर्सोवा (अंधेरी) येथे कांदळवनांवर अतिक्रमण केलेल्या बंगलेधारकांना महानगरपालिकेने भोगवटा प्रमाणपत्र दिल्याबाबत**

**(११) * ८४८८९ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्सोवा (अंधेरी) येथे कांदळवनांवर अतिक्रमण केलेल्या ६५ बंगलेधारकांना मुंबई महापालिकेच्या इमारत विभागाने भोगवटा प्रमाणपत्र दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनधिकृत बंगल्यांचे बांधकाम केल्याप्रकरणी वर्सोवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणात वादग्रस्त ६५ बंगल्यांची जागा आपलीच असल्याचे म्हाडाने मान्य करुन तसे पत्र दिनांक २५ एप्रिल, २०१७ रोजी, मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना, दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा. उच्च न्यायालयाचे आदेश डावलुन बंगलेधारकांना भोगवटा प्रमाणपत्र किंवा बांधकामास परवानगी देणा-या दोषी पालिका अधिका-यांची नावे दोन महिने झाली तरी मुंबई महापालिकेने जाहिर केलेली नसुन मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयाने सदर अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत दोन महिन्यापूर्वीच दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने अद्यापपर्यंत महापालिकेच्या अधिका-यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाशी पत्रव्यवहार केलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ६५ बंगले धारकांची नावे काय आहेत व सदरहू अतिक्रमित अनधिकृत ६५ बंगल्याचे निष्कासन करण्याबाबत तसेच पालिकेच्या दोषी अधिका-यांवर व त्यांचे नाव जाहीर न करणा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

सरदार वल्लभभाई पटेल नगर, वर्सोवा येथील सदर न.भू.क्र. १३७४ बी, मौजे वर्सोवा हा अभिन्यास म्हाडाचा आहे. सदर अभिन्यास दिनांक ०६.०२.१९९० व दिनांक १०.०९.१९९८ रोजी मंजूर करण्यात आला आहे. या अभिन्यासातील प्लॉटचे म्हाडामार्फत वितरण करण्यात आले असून त्यास केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाने ना-हरकत प्रमाणपत्र दिले आहे.

या अभिन्यासाच्या काही भागावरील ६३ बंगलेधारकांचे नकाशे महानगरपालिकेच्या तत्कालीन धोरणानुसार व विकास नियंत्रण नियमावली १९९१ अन्वये महानगरपालिकेमार्फत मंजूर करण्यात आले आहेत.

सदर ६३ बंगलेधारकांपैकी ३४ बंगलेधारकांनी मंजूर आराखड्यानुसार बांधकाम केल्याचे आढळल्याने तसेच आवश्यक तेथे एमसीझेडएमएचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर महानगरपालिकेमार्फत भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आहे व २ प्लॉट रिकामे आहेत.

(२) व (३) या अभिन्यासातील प्लॉटधारकांना सन २००५ नंतर बांधकाम परवानगी अथवा भोगवटा प्रमाणपत्र देताना मा. उच्च न्यायालयाने याचिका क्रमांक ३२४६ मध्ये दिनांक ०६.१०.२००५ रोजी दिलेल्या निदेशाचा भंग झाला असल्यास, अशा बंगलेधारकांविरुध्द फौजदारी कारवाई करण्याबाबत तसेच परवानगी देणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द पर्यावरण अधिनियमाखाली कारवाई करण्याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेस दिनांक ०८.०१.२०१७ व दिनांक ०९.०२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

तसेच, वर्सोवा पोलीस ठाणे येथे गु.र.क्रमांक ८७/२०१६, दिनांक १७.०९.२०१६ व गु.र.क्रमांक १२/२०१७, दिनांक ०५.०३.२०१७ अन्वये दोन गुन्हे दाखल झाले असल्याचे जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी कळविले आहे.

तथापि, मा. उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्रमांक ८७/२००६ मधील चेंबर समन्स क्रमांक १७२/२००७ मध्ये दिनांक ०६.१०.२००५ रोजीचे आदेश सुधारीत केले असून, ज्या भूखंड/अभिन्यास यांना केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने दिनांक १०.०२.२००३ व दिनांक १०.११.२००५ पर्यावरण विषयक मंजुरी/ना-हरकत दिली आहे असे भूखंड/अभिन्यास आदेशातून वगळले आहेत, त्यामध्ये न.भू.क्र. १३७४ बी, मौजे वर्सोवा या म्हाडा अभिन्यासाचा समावेश आहे.

त्यामुळे ३४ बंगलेधारकांना भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना दिनांक २६.०५.२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

तसेच, ६५ बंगले असलेल्या भूखंडाची मालकी मुंबई मंडळ, म्हाडा यांची असल्याबाबत म्हाडाने दिनांक ०८.०३.२०१७ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना कळविले आहे ही वस्तुस्थिती आहे.

(४) सदर ६३ बंगलेधारकांची नावे पुढीलप्रमाणे आहेत:-

| | |
|---|---|
| १. श्री. कमलेश दलाल | २. श्री. भवनलाल शर्मा |
| ३. श्री. एस. व्ही. गजधर | ४. मे. एक्सएनपी एम.एच.पी. |
| ५. श्री. अजयकुमार सद | ६. श्रीमती आशा पी. राठी |
| ७. श्रीमती एस.एस.पाटील | ८. श्री. डी.बी. भोसले |
| ९. मे. सोना फॅब्रीक्स प्रा.लि. | १०. एफ.डी. फेरीना |
| ११.श्रीमती सुवर्णकला चौधीक | १२. पी.व्ही.भाटीया |
| १३.श्रीमती मोनिका ए. कुमार | १४. श्री. राजकिशोर त्रिपाठी |
| १५. एस. एम. गायकवाड | १६. बी. पी. शाह |
| १७. के. जे. वैद्य | १८. विराप माजरा |
| १९. एस. सिंग | २०. एस. आर. शिंदे |
| २१. श्री. नरेश बी. काथरा | २२. श्री. रणजित सिंग |
| २३. श्रीमती कल्पना पारसकर | २४. एम. मियाजीवाला |
| २५. श्रीमती मीना सुरेश | २६. श्रीमती बीना आडवाणी |
| २७. डी. डी. चौपानी | २८. श्री. वसंतजी महाजन |
| २९. श्रीमती मिनाक्षी बिंडलीश | ३०. एस.आर. शिंदे |
| ३१. आर. एन. त्रिपाठी | ३२. एच. सी. पारीख |
| ३३. श्री. व्ही. एन.शाह | ३४. श्रीमती पुनम जयस्वाल |
| ३५. श्री. विजय चंदर | ३६. एच. एन. चाऊस |
| ३७. श्री. अजय कुमार | ३८. ए. के. राजा |
| ३९. श्री. बरन आदर्श | ४०. श्री. नामदेव आर. कांबळे |
| ४१. श्री. मनिष पी. संघवी | ४२. श्रीमती शोभा व्रेजा |
| ४३. यु. जी. तुटलेसा | ४४. एस. एम. धीवर |
| ४५. एस. एन. पिंटो | ४६. सुलतान एच. फैजाभॉय |

| | |
|---|---|
| ४७. आय. जे. बैनिजा | ४८. श्यामसुंदर गुप्ता |
| ४९. श्रीमती अलका याज्ञिक | ५०. एस. जे. सोनावणे |
| ५१.श्रीमती अपर्णा एस. कावळे | ५२. श्री. अतुल बी. खन्ना |
| ५३. बी. डी. पुरुस्वामी | ५४. राणी जयस्वाल |
| ५५. एस. शिवदासानी | ५६. एन. आर. सावंत |
| ५७. एम. के. लोकुवा | ५८. श्री. तेजस आर. मर्चन्ट |
| ५९. टी. एस. शेट्टी | ६०. पॉल थॉमस |
| ६१.श्रीमती जसवंत कौर चावला | ६२. एम.डी. पारेख |
| ६३. श्री. प्रदीप एम. मोटवानी | |

सदर ठिकाणी १० बंगलेधारकांनी त्यांच्या बंगल्याच्या मागील बाजूस केलेल्या अनधिकृत बांधकामावर महानगरपालिकेमार्फत निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वांद्रे (मुंबई) येथील विकासक कुमार मोरदानी यांनी २३० संक्रमण शिबीरांचा ताबा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाला न दिल्याबाबत**

**(१२) * ८५८३३ श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे (मुंबई) येथील विकासक कुमार मोरदानी यांनी २३० संक्रमण शिबीरांचा ताबा झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाला न दिल्याने विकासकावर खटला दाखल करण्याचे निर्देश गृहनिर्माण विभागाने एस.आर.ए ला दिल्याची बाब माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विकासकावर खटला दाखल करण्यात आला आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) विकासकाविरुध्द तातडीने एमआरटीपी कायद्याखाली गुन्हा नोंद करण्याबाबत दि. १०.०३.२०१७ च्या पत्रान्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास कळविण्यात आले आहे.
(२) व (३) या प्रस्तावाची झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून चौकशी करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने विकासकास महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ५३(१) अंतर्गत एमआरटीपी नोटीस देण्यात आली असून विकासक व वास्तूविशारद यांच्यावर एफआयआर दाखल करुन घेण्यासाठी वरिष्ठ पोलिस निरीक्षक, खार पोलिस स्टेशन यांना दि.७/७/२०१७ च्या पत्रान्वये कळविले असल्याचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

-----------------

## कोल्हापूर महानगरलिकेतर्फे बांधण्यात आलेल्या रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

**(१३) * ८५०७९ श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या नगरविकास विभागाकडून कोल्हापूर महानगरपालिकेला देण्यात आलेल्या जिल्हा नगरोत्थान योजना व महानगरपालिकेच्या स्वनिधीतून बांधण्यात आलेल्या रू.६ कोटी ५० लाख रुपयांच्या रस्त्यांची कामे ही निकृष्ट दर्जाची झाल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गुणवत्ता न राखता बांधकाम केलेल्या ५६ रस्त्यांपैकी १८ रस्त्यांचे त्रयस्थ संस्थेकडून लेखापरिक्षण केले असता तब्बल ७२ लाख ९९ हजार ७३३ रूपयांचे नुकसान झाल्याचा ठपका वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाकडून करण्यात आला असून सदर लेखापरिक्षण अहवाल हा कोल्हापूर महानगरपालिका अधिकारी वर्गाकडून गुप्त ठेवण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) • कोल्हापूर महानगरपालिकेतर्फे सन २०१३ ते २०१६ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान (जिल्हास्तर) व महापालिकेच्या स्वनिधीतून रु.३२.८९ कोटीचे ६६ रस्ते बांधण्यात आले आहेत.

• सदर ६६ रस्त्यांपैकी रु.६.७४ कोटीचे ३५ रस्ते खराब झाल्याचे सर्वेक्षणात आढळून आले आहे, हे खरे आहे.

(२) व (३) • खराब झालेल्या ३५ रस्त्यांचे वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड या दोन त्रयस्थ संस्थांमार्फत तांत्रिक निरिक्षण करण्यात येत आहे.

• त्यापैकी वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली यांनी सादर केलेल्या अहवालानुसार व निविदेतील तरतुदीनुसार दोष दायीत्व कालावधीमधील १८ रस्त्यांची दुरुस्ती ठेकेदाराकडून करुन घेण्याची कार्यवाही कोल्हापूर महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.

• उर्वरित १७ रस्त्यांचा शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड या त्रयस्थ संस्थेचा अहवाल अद्याप महानगरपालिकेस प्राप्त झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईच्या गोरेगाव (प) येथील सिध्दार्थ नगर मधील पत्रा चाळीच्या पुनर्विकास प्रकल्पाच्या कामाबाबत

**(१४) * ८९०४३ श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई गोरेगांव (प) येथील सिध्दार्थनगरमधील पत्रा चाळ पुनर्विकास प्रकल्पातील गैरव्यवहाराच्या चौकशीसाठी नेमलेल्या प्रधान सचिव, गृहनिर्माण विभागाच्या एक सदस्यीय समितीने आपला अहवाल मा. मुख्यमंत्री यांच्याकडे माहे एप्रिल २०१६, मध्ये वा त्या दरम्यान सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, या अहवालानूसार दोषींवर कोणती कारवाई केली तसेच तेथील रहिवाशांना घराचा ताबा लवकर मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

मा. राज्यमंत्री, गृहनिर्माण यांनी दिलेल्या आदेशानुसार अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण यांनी या प्रकरणी आपला अहवाल एप्रिल २०१७ मध्ये शासनास सादर केलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिडकोचे मुख्य भुमापन अधिकारी व भुमापन अधिकारी यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(१५) * ८५२४२ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई गुन्हे अन्वेषण विभागाने सिडकोचे मुख्य भुमापन अधिकारी नझीर शेख व भुमापन अधिकारी दत्तात्रय मुकादम या दोघांना १३ भुखंडाच्या ३८ कोटी रुपयांच्या आर्थिक गैरव्यवहारा प्रकरणी माहे मार्च-एप्रिल मध्ये दाखल झालेल्या गुन्हया अंतर्गत दिनांक १३ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी पोलिस उपायुक्त दिलीप सावंत यांनी सुरुवातीला ७ गुन्हे दाखल केल्यानंतर सिडकोने तक्रार देऊन ५ गुन्हे दाखल केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी संपूर्ण माहिती असूनही गुन्हे दाखल करण्यास सिडकोने हेतुतः विलंब केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणाची चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार याप्रकरणी सदर भुमापन अधिका-यांविरोधात व इतर संबंधीत दोषींवर तसेच गुन्हे दाखल करण्यास विलंब करणा-या सिडकोच्या संबंधीत अधिका-यांविरोधात कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नवी मुंबई गुन्हे अन्वेषण विभागाने सिडकोचे मुख्य भुमापक नझीर शेख व सहायक भुमापक दत्तात्रय मदन मुकादम या दोघांनी नोव्हेंबर २०१२ मध्ये त्यांचे अकार्यालयीन कक्षेत गुन्ह्यातील आरोपीसह भुखंडाचे ठिकाणी जाऊन भुखंडाचे सिमांकन करुन देवून आरोपींकडून रु.१५,०००/- घेवून आरोपीना गुन्ह्यात मदत केल्याचे निष्पन्न झाल्याने दिनांक २२.८.२०१६ रोजी दाखल झालेल्या गुन्ह्याअंतर्गत दिनांक ११.५.२०१७ रोजी अटक केली आहे.
(२) हे खरे नाही.

सदर प्रकरणी सिडकोचे अधिकारी / कर्मचारी यांचे तक्रारीवरुन सन २०१६ मध्ये ५ गुन्हे आणि सन २०१७ मध्ये १ गुन्हा दाखल करण्यात आला आहे तर पोलीसांकडे प्राप्त तक्रारीवरुन व चौकशी अधिकारी यांचे फिर्यादीवरुन सन २०१७ मध्ये एकूण ६ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(३), (४) व (५) सदर प्रकरणी सिडकोमार्फत गुन्हे दाखल करण्यास विलंब झालेला नाही. सबब, सदर प्रकरणी गुन्हे दाखल करण्यास विलंब न झाल्याने संबंधित कर्मचारी / अधिकारी यांचे विरुद्ध कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही.

-----------------

## भीलेवडी (ता.पलूस, जि.सांगली) येथील एका शाळकरी मुलीवर लैंगिक अत्याचार करुन हत्या केल्याबाबत

**(१६) * ९०६७२ डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भीलेवडी (ता.पलूस, जि.सांगली) येथील एका शाळकरी मुलीवर सामुहीक लैंगिक अत्याचार करुन तीची हत्या करण्यात आल्याचे माहे जानेवारी-२०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय,हे खरे आहे.

(२) होय.

(३) आरोपीवर भिलवडी पोलीस ठाणे भाग ५ गुरनं-०२/२०१७ भा.द.वि.संक ३०२,३७६ (अ) बाल लैंगिक अत्याचार अधिनियम २०१२ चे कलम ४,६,८ प्रमाणे दिनांक ६/१/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीस दि. ०७.०३.२०१७ रोजी अटक करण्यात आली आहे. सद्यस्थितीत आरोपीवर दोषारोपपत्र दाखल केले असून केस जिल्हा विशेष सत्र न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या भगवती रुग्णालयाच्या गैरव्यवस्थापनामुळे रक्तपेढीतील संकलित रक्त वाया गेल्याबाबत

**(१७) * ८५१४० श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विविध सामाजिक संस्था तसेच राजकीय पक्षांकडून आयोजित करण्यात येणाऱ्या रक्तदान शिबीरातून गोळा करण्यात आलेल्या रक्तपेढीतील रक्त संकलन केलेल्या सुमारे २४४६ पिशव्या (सुमारे ८५६ लिटर रक्त) मुंबई महानगरपालिकेच्या भगवती रुग्णालयाच्या गैरव्यवस्थापनामुळे वाया गेल्याची बाब मुंबई जिल्हा एड्स नियंत्रण सोसायटीने एप्रिल, २०१७ मध्ये दिलेल्या माहितीमध्ये नमूद करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संकलित रक्त नमुन्याचे योग्य नियोजन करण्यासाठी कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) भगवती रुग्णालय रक्तपेढीमार्फत सन २०१२ ते २०१६ या ५ वर्षांच्या कालावधीत १२,०५७ पिशव्या रक्त संकलित करण्यात आले, त्यापैकी ८२२ पिशव्या संसर्गित असल्याचे आढळल्याने तसेच कालबाह्य झालेल्या ७८० पिशव्या अशा एकूण १६०२ पिशव्या नष्ट करण्यात आल्या आहेत ही वस्तुस्थिती आहे.

(२) रक्त पेढीतील रक्त संकलन केलेल्या पिशव्यांचा योग्य व अधिकतम वापर होण्यासाठी महानगरपालिकेमार्फत पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :-

• अतिरिक्त रक्तसाठा उपलब्ध असल्यास इतर शासकीय व पालिकेच्या रक्तपेढयांना त्यांच्या गरजेनुसार देण्यात येतो.

• रक्त संकलन अधिकारी व समाज विकास अधिकारी यांना रक्त संकलन साठा व त्याचा वापर याबाबत दक्ष राहण्यास व त्याबाबतचा अहवाल वेळोवेळी सादर करण्याच्या सूचना देण्यात येतात.

• उपलब्ध रक्त साठा रुग्णाच्या आवश्यकतेनुसार पालिकेच्या तसेच इतर खाजगी रुग्णालयांना पुरविला जातो.

• यापुढे संकलित केलेल्या रक्ताच्या पिशव्या कालबाह्य होऊ नयेत याची दक्षता घेण्याच्या सूचना बृहन्मुंबई महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील अंधेरी, विलेपार्ले व अन्यत्र ९ ठिकाणी बेकायदेशीररित्या टॉवर्स व व्यावसायिक इमारती उभारल्याबाबत

**(१८) * ८५४३९ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पश्चिम उपनगरातील अंधेरी, विलेपार्ले व अन्यत्र ९ ठिकाणी श्री.विजय ठक्कर या विकासकाने बेकायदेशीररित्या व एफएसआयचे उल्लंघन करून टॉवर्स

व व्यावसायिक इमारती उभारल्या असून या प्रकरणी आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी मा.मुख्यमंत्री आदीकडे मागील १ वर्षापासून सातत्याने तक्रारी करण्यात आलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.विजय ठक्कर या विकासकाच्या विरोधात एमपीडीए अंतर्गत तसेच सदरहू बेकायदेशीर व एफएसआयचे उल्लंघन करून उभारलेल्या टॉवर्स व व्यावसायिक इमारतींवर कारवाई होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर प्रकरणी ९ ठिकाणांबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी संबंधितांविरुध्द महानगरपालिकेमार्फत एम.आर.टी.पी. अन्वये कार्यवाही करण्यात आली असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

**१. न.भु.क्र. १/A/a/B२ मौजे गोरेगांव, ओशिवरा येथील डी.एल.एच. एनक्लेव्ह, गोरेगांव (पश्चिम) :-**

एम.आर.टी.पी. अधिनियम १९६६ च्या कलम ५३ (१) अन्वये दिनांक २८.०४.२०१६ रोजी नोटीस देण्यात आली असून, सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक २३.०३.२०१७ रोजीच्या आदेशानुसार पुढील कारवाईस स्थगिती देण्यात आली आहे.

**२. न.भु.क्र. ५८७, प्लॉट क्र. ५४ (ए), टी.पी.एस. ४ व्हिलेज, विलेपार्ले (पश्चिम) :-**

एम.आर.टी.पी. अधिनियम १९६६ च्या कलम ५३(१) अन्वये दिनांक ०४.०८.२०१२ रोजी नोटीस देण्यात आली आहे.

**३. न.भु.क्र. ८२२/८, ८२२, व्हिलेज आंबिवली, अंधेरी (पश्चिम) :-**

एम.आर.टी.पी. अधिनियम १९६६ च्या कलम ५३ (१) अन्वये दिनांक २५.०१.२०१० रोजी नोटीस बजाविण्यात आली असून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

**४. न.भु.क्र. १५२, १५३, १७४ ते १७७, व्हिलेज आंबिवली, अंधेरी (पश्चिम) :-**

सदर बांधकाम प्रचलित नियमानुसार दंड आकारुन नियमित करण्यात आले आहे. तसेच, सदर बांधकामास दिनांक १०.०६.२०१५ रोजी महानगरपालिकेमार्फत भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

**५. न.भु.क्र. ८३४, प्लॉट नं. २९, व्हिलेज आंबिवली, अंधेरी (पश्चिम) :-**

एम.आर.टी.पी. अधिनियम १९६६ च्या कलम ५३ (१) अन्वये नोटीस बजाविण्यात आली असून, सदर प्रकरणी अंबोली पोलीस ठाणे येथे दिनांक २२.०४.२०१७ रोजी संबंधितांविरुध्द एफ.आय.आर. क्रमांक २०/२०१७ नोंदविण्यात आला आहे.

**६. न.भु.क्र. ८३४, प्लॉट नं. ७, व्हिलेज आंबिवली, अंधेरी (पश्चिम) :-**

एम.आर.टी.पी. अधिनियम १९६६ च्या कलम ५३ (१) अन्वये नोटीस बजाविण्यात आली असून, सदर प्रकरणी अंबोली पोलीस ठाणे येथे दिनांक २२.०४.२०१७ रोजी संबंधितांविरुध्द एफ.आय.आर. क्रमांक २१/२०१७ नोंदविण्यात आला आहे.

**७. न.भु.क्र. ८४४/३७ ते ३९, व्हिलेज आंबिवली, अंधेरी (पश्चिम) :-**

एम.आर.टी.पी. अधिनियम १९६६ च्या कलम ५३ (१) अन्वये नोटीस बजाविण्यात आली असून सदर अनधिकृत बांधकाम महानगरपालिकेमार्फत निष्कासित करण्यात आले आहे.

**८. न.भु.क्र. एफ/७५०, भूखंड क्र. २६८, टी.पी.एस. ३, वांद्रे (पश्चिम) :-**

एम.आर.टी.पी. अधिनियम १९६६ च्या कलम ५३ (१) अन्वये दिनांक १६.११.२०१६ रोजी गाळेधारकांना नोटीसा बजाविण्यात आल्या असून सदर प्रकरणी मा. नगर दिवाणी न्यायालयाने दिनांक २५.०१.२०१७ रोजीच्या आदेशान्वये मनाई हुकूम पारित केलेला आहे. सदर प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे.

**९. न.भु.क्र. ७/४, प्लॉट क्र. ६, व्हिलेज विलेपार्ले, विलेपार्ले (पश्चिम) :-**

एम.आर.टी.पी. अधिनियम १९६६ च्या कलम ५३ (१) अन्वये दिनांक १५.०६.२०१६ रोजी नोटीस बजाविण्यात आली आहे. सदर नोटीशीविरोधात संबंधितांनी मा. नगर दिवाणी न्यायालय येथे दावा दाखल केला असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

-----------------

## वायरी-भूतनाथ (ता.मालवण,जि. सिंधुदूर्ग) येथे समुद्रात बुडून आठ जणांचा मृत्यू झाल्याबाबत

**(१९) * ८७०८५ श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव),**

**श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेळगांव येथील (ता.मालवण, जि.सिंधुदूर्ग) मराठा मंडळ अभियांत्रिकी महाविद्यालयातील सहलीसाठी आलेल्या आठ जणांचा मालवण वायरी-भूतनाथ समुद्रात बुडून मृत्यू झाल्याची घटना दिनांक १५ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) तसेच, रायगड जिल्हयाला २४ समुद्र किनारे लाभले असून मोठया प्रमाणात पर्यटक येत असून माहे जानेवारी २०१६ ते मार्च २०१७ या कालावधीत एकूण २५ पर्यटकांचे पाण्यात बुडून मृत्यू झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिवसेंदिवस रायगड जिल्ह्यासह संपूर्ण कोकण किनारपट्टीवर पर्यटकांचे समुद्रात बुडून मृत्यू होण्याच्या संख्येत वाढ होत असल्यामुळे शासनाच्या सुचनेनुसार सर्व समुद्रकिना-यांवर पर्यटकांच्या सुरक्षेसाठी जीवरक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नूसार शासनाने समुद्रात बुडून मृत्यू होण्याचे प्रकार थांबविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) रायगड जिल्हयात माहे जानेवारी २०१६ ते मार्च २०१७ या कालावधीत एकूण १७ पर्यटकांचे पाण्यात बुडून मृत्यु झाले आहेत.

(३) होय.

कोंकण परिक्षेत्रातील घटक जिल्हयातील समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांच्या सुरक्षेकरीता खालीलप्रमाणे एकूण १०० जीवरक्षकांची नियुक्ती करण्यांत आलेली आहे :-

ठाणे ग्रामीण (१०) पालघर (१८) रायगड (४०)

रत्नागिरी (७) सिंधुदुर्ग (२५)

(४) व (५) दुर्घटनेतील मयत हे दिनांक १५.०४.२०१७ रोजी मराठा इंजिनीअरींग कॉलेज, बेळगांव येथून पर्यटनासाठी वायरी भूतनाथ येथील समुद्रकिनारी आले होते व एकत्रितरित्या समुद्राच्या पाण्यात आंघोळ करण्यासाठी गेले असता त्यांना लाटांचा अंदाज न आल्याने ते लाटेबरोबर खोल पाण्यात ओढले जावून बुडून मयत झाल्याचे आढळून आले आहे.

यात्प्रकरणी पोलीस ठाणे मालवण येथे आकस्मिक मृत्यु नोंदणी क्रमांक १८/२०१७ ते २४/२०१७ (एकूण ८), भा.दं.वि.कलम १७४ प्रमाणे नोंद घेण्यांत आली आहे.

सदर दुर्घटनेचे प्रकार थांबविण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यांत येत आहे :-

• समुद्रकिनारी बिट मार्शल पेट्रोलिंग, पोलीस स्पीड बोटींची पेट्रोलिंगद्वारे गस्त ठेवण्यांत येते.

• स्थानिक मच्छिमार व सागर रक्षक दल सदस्य यांचेमार्फत पर्यटकांना धोक्याच्या सूचना देण्यांत येतात.

• पोलीस ठाणे स्तरावर समुद्रकिनारी भागात सागर रक्षक दल, मच्छिमार बांधव, मच्छिमार सोसायटी सदस्य व स्थानिक ग्रामस्थ यांच्या बैठका घेऊन मार्गदर्शक सूचना देण्यांत येतात.

• समुद्रकिनारी असलेल्या उंच मनोऱ्यावरुन टेहळणी करुन खोल पाण्यात जाणाऱ्या पर्यटकांना लाऊडस्पिकरवरुन पाण्याच्या खोलीबाबत सूचित केले जाते.

• समुद्री पर्यटकांच्या संरक्षणाच्या अनुषंगाने आवश्यक तेथे ग्रामपंचायती, नगरपालिका व महानगरपालिकेमार्फत धोक्यांच्या सूचनांचे फलक पर्यटनस्थळी / समुद्रकिनाऱ्यावर / गर्दीच्या ठिकाणी लावण्यांत आलेले आहेत.

• मच्छिमार, सागर रक्षक दलाचे सदस्य व किनारा भागातील नागरीक यांच्याशी संपर्क साधण्यासाठी सर्व जिल्हयातील नियंत्रण कक्षात कोस्टल हेल्पलाईन क्रमांक १०९३ व बल्क एसएमएस यंत्रणा कार्यान्वित करण्यांत आलेली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्हयातील राधानगरी व आजरा येथील पोलीस स्टेशन इमारत अपुर्ण अवस्थेत असल्याबाबत

**(२०) * ८७३५३ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राधानगरी व आजरा (जि.कोल्हापूर) येथील पोलीस स्टेशन इमारत अपुर्ण अवस्थेत असल्याच्या कारणामुळे मा.राज्यमंत्री गृह (ग्रामीण) यांचेकडे बैठक घेऊनही निधी उपलब्ध करणेकरीता अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नसल्यामुळे पोलीस स्टेशन इमारती अपूर्ण अवस्थेत व विनावापर पडून आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत दोन वर्षे निधी उपलब्ध करणेकरीता वारंवार पाठपुरावा करून देखील याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास पोलीस स्टेशन इमारतीस निधी उपलब्ध करण्याकरीता शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) कोल्हापूर येथील राधानगरी व आजरा पोलीस स्टेशन बांधकामासाठी सुधारीत प्रशासकिय मान्यतेची कार्यवाही प्रगतिपथावर आहे. सुधारित प्रशासकीय मान्यतेनंतर निधी उपलब्धता मर्यादेत निधी उपलब्ध करण्यात येईल.

-----------------

## मुंबईतील शिवडी येथील बारा बी.डी.डी चाळींचा पुनर्विकास करण्याबाबत

**(२१) * ८६६९९ श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण),**

**श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील शिवडी येथील बारा बी.डी.डी चाळी जीर्ण व मोडकळीस आल्या असतानाही या चाळींचा पुनर्विकास करण्याबाबत शासनाने अद्याप कोणतीच कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ९० वर्षांच्या चाळींतील घरांचे स्लॅब अचानक कोसळत असल्याने रहिवाश्यांच्या जीवीताला धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बाब स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदनाद्वारे शासनाच्या तसेच मा. मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) हे खरे नाही.

मुंबईतील बी.डी.डी. चाळींचा पुनर्विकास करण्याबाबत मा. मंत्रीमंडळाच्या दि. १७.०३.२०१६ च्या बैठकीत निर्णय घेण्यात आला असुन त्यानुसार बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासाबाबत दि. ३०.०३.२०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. शिवडी येथील बी.डी.डी. चाळी मुंबई पोर्ट ट्रस्टच्या जागेवर असल्याने केंद्र शासनाकडुन सहमती प्राप्त झाल्यास त्या चाळींचा अंतर्भाव पुनर्विकास प्रक्रियेमध्ये करण्यात येईल असा निर्णय घेण्यात आलेला आहे.शिवडी येथील बी.डी.डी. चाळींखालील जागा ही मुंबई पोर्ट ट्रस्ट यांच्या मालकीची असल्याने ती जागा प्रथम महाराष्ट्र शासनाच्या नावे करण्याच्या अनुषंगाने मुख्य सचिव यांच्या स्तरावरुन दि.२७.०१.२०१७ रोजीच्या पत्रान्वये सचिव, जहाज मंत्रालय, भारत सरकार व अध्यक्ष, मुंबई पोर्ट ट्रस्ट यांना विनंती करण्यात आलेली आहे. तद्नंतर मुंबई पोर्ट ट्रस्ट यांच्या दि.२३.०३.२०१७ च्या पत्रान्वये सदर चाळींचा पुनर्विकासाबाबतचा प्रस्ताव म्हाडाकडुन प्राप्त झाल्यानंतर या प्रकरणी निर्णय घेण्यात येईल असे कळविले आहे. त्या अनुषंगाने म्हाडाने शिवडी येथील बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पाबाबत “सर्वांगिण सुसाध्यता अहवाल” (Feasibility Report) तयार करण्यासाठी वास्तुशास्त्रज्ञ सल्लागार यांची दि.११.०५.२०१७ रोजी नियुक्ती केली आहे व पुढील कार्यवाही सुरु आहे असे म्हाडाने कळविलेले आहे.

(२) संचालक, मुंबई विकास विभाग चाळी यांच्या अहवालानुसार श्री.चंद्रकांत पाटील, मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम यांनी दि.२५.६.२०१५ रोजी लोकप्रतिनिधी व अधिकारी यांच्या समवेत  बी.डी.डी. चाळींची पाहणी केली होती.

मा. मंत्री महोदयांनी दिलेल्या सूचना, स्थानिक लोकप्रतिनिधी व रहिवाशांनी केलेल्या दुरुस्तीच्या कामाच्या मागणीच्या अनुषंगाने आणि बी.डी.डी. चाळीतील इमारतीं पुढील ४ ते ५ वर्षात (सदर चाळींची पुनर्बांधणी पूर्ण होईपर्यंत) सुस्थितीत राहतील अशा तातडीची व अत्यावश्यक दुरुस्तींची कामे करण्यासाठी रुपये ८० कोटी पैकी सन २०१५-१६ मध्ये विविक्षित दुरुस्ती कार्यक्रमाअंतर्गत रुपये १३.६४ कोटी रकमेची एकूण २०७ चाळींपैकी १८५ बी.डी.डी. चाळीतील पहिल्या टप्प्यात प्रसाधन गृहाचे नुतनीकरण, प्रसाधनगृहाचे दरवाजे, सदनिकांच्या खिडक्या व खराब झालेले छत, कॉलम, बीमला पॉलिमर प्लॅस्टर व मोडकळीस आलेल्या भिंतीची दुरुस्ती करणे इत्यादी कामे तसेच सांडपाणी वाहिन्यांची, जलवाहिन्यांची दुरुस्ती व इतर आवश्यक दुरुस्त्या उपलब्ध निधीप्रमाणे पूर्ण करण्यात आल्या आहेत.  तसेच दुसऱ्या टप्प्यातील उपरोक्त संवर्गातील आवश्यक त्या चाळींच्या कामासाठी व पावसाळयात छतातून होणारी गळती थांबविण्यासाठी टारफेल्ट व डांबरीकरण करण्यासाठी रु. ८ कोटी सन २०१७-१८ साठी मंजूर झालेले असून निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर व उपलब्ध निधीनुसार कामे हाती घेण्यात येतील,असे संचालक ,मुंबई विकास विभाग चाळी यांनी कळविले आहे.

(३) संचालक, मुंबई विकास विभाग चाळी यांनी त्यांच्या कार्यालयास अशा प्रकारचे कोणतेही निवेदन प्राप्त झालेले नाही असे कळविलेले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## एमएमआरडीए प्राधिकरणातर्फे चेंबूर-सांताक्रुज लिंक रोड, सीएसक्र.४७ मधील बांधकाम केलेल्या पुनर्वसन प्रकल्पात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२२) * ८५३७९ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील, चेंबूर-सांताक्रुज लिंक रोड, नवीन टिळक नगर, सीएसक्र. ४७ मध्ये विस्थापित भाडेकरुंचे पुनर्वसन करण्यासाठी राबविलेल्या पुनर्विकास प्रकल्पातील निकृष्ट बांधकाम व गैरव्यवहार दडपण्यासाठी एमएमआरडीए प्राधिकरणाच्या अभियंता विभागाने इम्पॅक्ट डिझाईन ग्रुप यांना काम दिले

असतानाही श्री. सुरेंद्र राणे यांना परस्पर ७ लाख रुपये देवून बांधकाम पूर्णत्वाचा दाखला घेतल्याचा प्रकार निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकल्पाचे प्लान मंजूर करण्याचे सर्व काम इम्पॅक्ट डिझाईन ग्रुप या संस्थेने केले असतानाही सुरेंद्र राणे यांची पुर्नःनियुक्ती करुन त्यांच्याकडून कोणत्या अधिनियमाच्या आधारे प्रकल्पाच्या बांधकाम पूर्णत्वाचा दाखला घेण्यात आला आहे,

(३) असल्यास, सदरहू प्रकल्पाचे स्टील्ट प्लस १२ मजल्याची ५३ कोटी रुपये खर्चाची निविदा मागविण्यात आली असताना १६ मजली इमारतीच्या १७५ कोटीच्या सुधारित अंदाज पत्रकातील खर्चास प्राधिकरणाने मंजूरी देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणाची शासनाने चौकशी करुन अभियंता विभागातील उप अभियंता यांचेसह संबंधीत दोषी अभियंता अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) मे. इम्पॅक्ट डिझाईन ग्रुप, वास्तुविशारद सल्लागार यांनी अपेक्षित कालावधीत भोगवटा प्रमाणपत्र मिळण्यासाठी आवश्यक बाबींची पूर्तता न केल्याने तसेच त्यांचा कंत्राट कालावधी संपल्याने मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाने त्यांचे बरोबर कंत्राट संपुष्टात आले.

नविन वास्तुविशारद सल्लागार श्री.सुरेंद्र राणे यांचा विहीत वास्तुविशारदातुन आलेल्या प्रस्तावातुन कमीत कमी देकार दर रु.७.५० लक्ष असल्याने त्यांची नेमणुक करण्यात आली.

सदर नेमणुकीस बृहन्मुंबई महानगरपालिकेची मान्यता घेण्यात आली व तद्नंतर नविन वास्तुविशारद सल्लागाराने पुर्णत्वाचा दाखला दिला आहे.

(३), (४) व (५) मुंबईतील चेंबूर, नवीन टिळक नगर, सीटीएस ४७ येथिल प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार करण्यात आले आहे.

सदर कामाची कंत्राटाची रक्कम रु. ५६ कोटी इतकी होती व तद्नंतर मे. इम्पॅक्ट डिझाईन ग्रुप, प्रकल्प व्यवस्थापक सल्लागाराने शिफारस केल्याप्रमाणे सुधारित प्रशासकीय मान्यता रु. १०७ कोटी इतकी आहे. अंदाजपत्रकीय किंमत वाढण्याची मूळ कारणे मुख्यत्वे मुंबई महानगरपालिकेच्या

नविन नियमावलीस अनुसरुन व उपलब्ध भूखंडामध्ये संपूर्ण प्रकल्पग्रस्तांच्या घरांचे नियोजन करण्याकरीता करावे लागणा-या अतिरिक्त बाबीं आहेत. तसेच सुधारीत किंमतीस प्राधिकरणाच्या  सक्षम स्तरावरुन मंजूरी घेण्यात आली आहे.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेत रस्त्याच्या कामात कोटयावधी रूपयांचा झालेला गैरव्यवहार

**(२३) * ८७०८७ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रस्त्याच्या कामात कोटयावधी रूपयांचा झालेल्या गैरव्यवहार प्रकरणी चौकशी समितीने पहिल्या टप्प्यात चौकशी करून अहवाल सादर केल्यानंतर रस्ते विभागाचे प्रमुख अभियंता सह काही अभियत्यांना व त्रयस्थ लेखापरिक्षण कंपनीच्या २२ अभियंत्यांना अटक करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौकशीच्या दुसऱ्या फेरीत २०० रस्त्यांच्या कामाबाबत चौकशी करून चौकशी समितीने आपला अहवाल आयुक्तांना सादर केलेला असतानाही सदरहू २०० रस्त्यांच्या कामात आढळून आलेल्या अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी व ठेकेदारांविरोधात आजमितीस कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या दुसऱ्या फेरीत चौकशी करण्यात आलेल्या २०० रस्त्यांच्या कामातील गैरव्यवहाराबाबत चौकशी समितीने ठपका ठेवण्यात आलेल्या संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांविरोधात विनाविलंब कारवाई होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रस्त्यांच्या कामाबाबत चौकशी समितीने पहिल्या टप्प्यात ३४ रस्त्यांच्या कामाची तपासणी करुन दिनांक २०.०४.२०१६ रोजी अहवाल सादर केला आहे.

तसेच, आझाद मैदान पोलीस ठाणे येथे दिनांक २७.०४.२०१६ रोजी प्रथम खबर अहवाल क्रमांक १६६/२०१६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी महानगरपालिकेचे तत्कालिन प्रमुख अभियंता (रस्ते व वाहतूक), प्रमुख अभियंता (दक्षता) आणि कार्यकारी अभियंता (रस्ते/प. उपनगरे) यांना महानगरपालिकेच्या सेवेतून निलंबित करण्यात आल्यानंतर आझाद मैदान पोलीस स्टेशनमार्फत अटक करण्यात आली.

तसेच, ठेकेदार कंपनीचा १ संचालक, १२ साईट इंजिनिअर्स व त्रयस्थ लेखापरीक्षक (TPQA) कंपनीचे १० साईट ऑडिटर्स/इंजिनिअर्स यांना आझाद मैदान पोलीस स्टेशनमार्फत अटक करण्यात आली.

(२) व (३) चौकशीच्या दुसऱ्या फेरीत २०० रस्त्यांच्या कामाबाबत चौकशी करुन चौकशी समितीने आपला अहवाल सादर केला असून, रस्त्यांच्या कामात आढळून आलेल्या अनियमिततेबाबत महानगरपालिकेमार्फत पुढीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे:-

• चौकशी समितीच्या अहवालानुसार संबंधित कर्मचारी / अधिकारी यांची सखोल चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सदर खात्यांतर्गत चौकशी करण्यासाठी चौकशी अधिकारी म्हणून महानगरपालिकेचे उप आयुक्त (विशेष अभियांत्रिकी) यांची नियुक्ती करण्यात येऊन चौकशी प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

• संबंधित कंत्राटदार व त्रयस्थ लेखापरीक्षक यांना काळया यादीत टाकण्याच्या प्रक्रियेंतर्गत कारणे दाखवा नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

• सदर कंत्राटदार व त्रयस्थ लेखापरीक्षक यांना महापालिकेच्या निविदा प्रक्रियेत सहभागी होण्यास मनाई करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मुंब्रा, कळवा, कोपरी, वागळे इस्टेट इ. ठिकाणच्या धोकादायक इमारतींबाबत

**(२४) * ८६९३५ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महापालिका क्षेत्रातील मुंब्रा, कळवा, नौपाडा, कोपरी, वागळे इस्टेट, लोकमान्यनगर इ. भागातील सुमारे ३३२५ इमारती मोडकळीस आलेल्या असुन धोकादायक स्थितीत असल्याची गंभीर माहिती एप्रिल, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केलेली आहे काय तसेच मोडकळीस आलेल्या इमारतींमधील रहिवाशांची सुरक्षितता व इमारतींच्या पुनर्बांधणीसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सन २०१७ मध्ये ठाणे महानगरपालिका हद्दीत पावसाळ्यापूर्वी केलेल्या सर्वेक्षणानुसार एकूण ३६९३ धोकादायक इमारती आढळून आलेल्या असून सदर इमारतींपैकी ६९ इमारती सी-१ (अतिधोकादायक, राहण्या अयोग्य व तात्काळ निष्कासीत करणे प्रवर्गात मोडणाऱ्या) प्रवर्गातील आहेत.
(२) ठाणे महानगरपालिकेने मोडकळीस आलेल्या इमारतीतील रहिवाशांच्या सुरक्षिततेबाबत शासन निर्णय ०५.११.२०१५ अन्वये कारवाई करण्यात येते.

अतिधोकादायक व राहण्यास अयोग्य इमारती रिक्त करण्यात येतात. अशा ६८ इमारतींपैकी ५५ इमारती रिक्त करण्यात आल्या आहेत. रिक्त करण्यात आलेल्या ५५ इमारतीपैकी १३ इमारती तोडण्यात आल्या आहेत. उर्वरित १३ इमारतींपैकी ६ इमारती रिक्त करण्यास न्यायालयाची स्थगिती आहे. उर्वरित ७ इमारती रिक्त करण्यात येणार आहेत.

ठाणे शहराच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये इमारतींच्या पुनर्बांधणी संदर्भात शासनाने दिनांक ०५.०७.२०१७ च्या अधिसूचनेनुसार नागरी पुनर्निर्माण योजनेची नियमावली समाविष्ट केली आहे. यामध्ये नियमातील तरतुदींच्या अनुषंगाने अधिकृत व अनधिकृत इमारतींचा समावेश करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सातारा जिल्ह्यातील कराड नगरपालिकेच्या सांडपाणी प्रकिया (एसटीपी) प्रकल्पाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(२५) * ९००३४ श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील कराड नगरपालिकेचा सांडपाणी प्रकिया (एसटीपी) प्रकल्प मागील ४ वर्षापासून अपूर्ण अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांडपाणी प्रकिया (एसटीपी) प्रकल्प नसल्याने कराडच्या कृष्णा-कोयना नदीपात्रामध्ये शहरातील नाल्याचे सांडपाणी मिसळले जात असल्यामुळे नदीपात्रातील पाणी दुषित होत असून जलपर्णीचा धोका वाढला आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सांडपाण्यामुळे कृष्णा-कोयनेच्या अस्तित्वासह मानवी आरोग्यसही धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कराड नगरपालिका हद्दीतील सांडपाणी प्रकिया (एसटीपी) प्रकल्प तातडीने सुरु करण्याकरिता शासनातर्फे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) • महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियान (राज्यस्तर) अंतर्गत कराड शहरातील जुन्या भुयारी गटार योजनेचे बळकटीकरण व वाढीव हद्दीतील भागासाठी भुयारी गटार योजना सन २०१२ मध्ये मंजूर केली आहे.

• सदर प्रकल्पामध्ये १२.५० एम.एलडी. क्षमतेच्या मलप्रक्रिया केंद्राचा समावेश आहे.

• सदर मलप्रक्रिया केंद्राचे काम पूर्ण झाले असून त्यामध्ये सांडपाणी घेण्याचे काम कराड नगरपरिषदेने सुरु केले आहे.

• सदर प्रकल्पाचे उर्वरित काम डिसेंबर, २०१७ अखेर पूर्ण होणे अपेक्षित आहे.

(२) • शहराच्या वाढलेल्या लोकसंख्येमुळे काही प्रमाणात सांडपाणी नैसर्गिक नाल्याने नदीत मिसळते. त्यावर क्लोरीनेशन करणे, टिश्यु कल्चर बिमा बांबुची रोपे लावणे व नैसर्गिक नाले अडवून सांडपाणी शेतीस देण्याची कार्यवाही कराड नगरपरिषदेमार्फत सुरु आहे.

• तसेच सदर सांडपाणी नदीपात्रामध्ये मिसळू नये म्हणून नगरोत्थान योजनेअंतर्गत मंजूर योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या जुन्या भुयारी गटार योजनेचे बळकटीकरण अंतर्गत पंपिंग स्टेशन्सच्या जुन्या मोटर्स बदलण्याचे काम कराड नगरपरिषदेने सुरु केले आहे.

• सदर काम सप्टेंबर, २०१७ पर्यंत पूर्ण करण्याचे कराड नगरपरिषदेचे नियोजन आहे.

• सदर काम पूर्ण झाल्यानंतर नदीपात्रामध्ये सांडपाणी मिसळण्याचे बंद होणार असल्याबाबत कराड नगरपरिषदेने कळविलेले आहे.

(३) • सांडपाण्यामुळे मानवी आरोग्यास धोका निर्माण झाला नसलेबाबत कराड नगरपरिषदेमार्फत कळविण्यात आलेले आहे.

(४) व (५) • सदर प्रकल्पातील एसटीपीचे काम कराड नगरपरिषदेमार्फत पूर्ण झालेले असून प्रकल्पाचे उर्वरीत काम डिसेंबर २०१७ अखेर पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

-----------------

## मुंबईतील अतिधोकादायक इमारतींबाबत

**(२६) * ८८२१५ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील डॉकयार्ड रोड येथील महापालिकीची बाबू गेनू मार्केट इमारतीच्या २७ सप्टेंबर, २०१३ रोजी झालेल्या दुर्घटनेनंतर उत्तर मुंबई महापालिकेने सर्वच इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट सक्तीचे करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील ८५० इमारती अतिधोकादायक असून त्यांचे स्ट्रक्चरल ऑडिटही करण्यात आले असून त्यावर माहे एप्रिल, २०१७ पर्यंत कोणतीही उपाययोजना करण्यात आली नाही, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सदर ८५० धोकादायक, अतिधोकादायक अशा महापालिका, सरकारी व खाजगी मालकीच्या व प्रामुख्याने सी-(१) श्रेणीत मोडणाऱ्या इमारतींच्या संदर्भात महापालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ३५४ च्या अंतर्गत निष्कासनाच्या कार्यवाहीबाबत आगामी पावसाळापूर्व सदर इमारतींचे सर्वेक्षण करुन दिनांक ३० एप्रिल,२०१७ अखेरपर्यंत निष्कासनाची कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, नागरिकांनी व

भोगवटदरांनी मा.मुख्यमंत्री, मा.राज्यमंत्री(नगरविकास), मुख्य-सचिव, अतिरिक्त मुख्य-सचिव (नगरविकास), मा.महापालिका आयुक्त व आयुक्त मुंबई महानगर क्षेत्रविकास प्राधिकरण, महामुंबई तसेच त्यांच्या अधिनस्त नागरी सेवांचे प्राधिकारी यांच्या दिनांक २७ एप्रिल, २०१७ वा त्यानुसार निदर्शनास आणले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार अतिधोकादायक इमारतीमुळे होणाऱ्या दुर्घटना रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही. तथापि, मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ३५३ (ब) अन्वये, ३० वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त जुन्या इमारतींना बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र (Structural Audit Report) सादर करणे बंधनकारक आहे.

(२) व (३) माहे एप्रिल/मे, २०१७ मधील महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेल्या सर्वेक्षणामध्ये सी-१ प्रवर्गातील अतिधोकादायक व मोडकळीस आलेल्या एकूण ६१७ इमारती आढळून आल्या आहेत.

सदर इमारतींवर मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ३५४ अन्वये महानगरपालिकेमार्फत खालील प्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे :-

- ११२ इमारती रिकाम्या करण्यात आलेल्या आहेत.
- ४२ प्रकरणे तांत्रिक सल्लागार समितीकडे पाठविण्यात आली आहेत.
- १४० इमारतींची जल व विद्‌युतजोडणी खंडीत करण्यात आली आहे.
- २११ प्रकरणांमध्ये जल व विद्‌युतजोडणी खंडीत करण्याबाबतची कारवाई सुरु आहे.
- ११२ इमारतींची प्रकरणे न्यायप्रविष्ट असून त्यापैकी ४५ प्रकरणांमधील इमारतींबाबत दुर्घटना घडल्यास बृहन्मुंबई महानगरपालिका जबाबदार राहणार नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र न्यायालयात सादर केले आहे.

(४) इमारतीच्या पुनर्बांधकामाच्या कालावधी विषयी भाडेकरुंना निश्चित अशी हमी दिली जात नसल्यामुळे भाडेकरु अशा धोकादायक इमारती रिकामी करत नाहीत.

याकरीता त्यांच्या निवाऱ्याचे संरक्षण व सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ३५४ व त्यानुषंगाने कलम ४९९ मध्ये सुधारणा करुन नवीन पोटकलम ३ ते ६ दाखल करण्यात आलेली आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद शहरातील सिडकोच्या सर्व वसाहतीमधील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी उभारण्यात आलेल्या एसटीपी प्रकल्पाबाबत**

**(२७) * ९०४३२ श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद शहरातील सिडकोच्या सर्व वसाहतीमधील सांडपाण्यावर पक्रिया करण्यासाठी चिकलठाणा विमानतळाजवळ सिव्हरेज ट्रीटमेंट प्लांट उभारण्यात आल्यानंतर काही वर्षातच बंद पडला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या ठिकाणी येणारे सांडपाणी पाईपलाईन जागोजागी फुटल्याने उघड्यावर वाहत असतांनाही प्रकल्पाचे कामकाज पाहण्यासाठी सन २००९ पासून वर्षाकाठी २० लाख रुपये खर्च करण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सिव्हरेज ट्रीटमेंट प्लांट बंद असतांनाही दर वर्षाला २० लाख रुपये खर्च करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे, खरे नाही
सदर सिव्हरेज ट्रीटमेंट प्लांट नियमितपणे कार्यरत असून महानगरपालिकेतर्फे नियुक्त खाजगी कंत्राटदारामार्फत सदर प्लॉन्ट चालविण्यात येत आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
सदर प्रकल्पाची देखभाल व दुरुस्तीकरीता खाजगी कंत्राटदाराची नेमणूक करण्यात येत असून याकरीता १४ ते १५ लाख प्रतिवर्ष खर्च येतो.

सिव्हरेज ट्रीटमेंट प्लांटच्या अलीकडे सर्वसाधारणपणे १५० ते २०० मिटरच्या अंतरात सांडपाणी वाहून नेणारी पाईपलाईन जून,२०१६ मध्ये फुटलेली असल्याचे आढळून आले आहे.

सदर पाईप लाईन दुरूस्तीचे काम वेळीच का करण्यात आले नाही याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्याबाबत व सदर पाईपलाईन दुरुस्तीचे काम तातडीने हाती घेण्याबाबत महानगरपालिकेस कळविण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

सदर सिव्हरेज ट्रीटमेंट प्लांट नियमीतपणे कार्यान्वीत आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मिरा भाईंदर शहराच्या भुयारी गटार पाईप पुरवठा देयकामध्ये झालेला गैरव्यवहार**

**(२८) * ८७६०७ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा भाईंदर शहराकरीता सुरु केलेल्या सुमारे ४९५ कोटी रुपयांच्या भुयारी गटार पाईप पुरवठा देयकामध्ये मे.सुभाष प्रोजेक्ट अॅण्ड मार्केटिंग कंपनीने गैरव्यवहार केल्याचे माहे जून, २०१७ ला निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाईप पुरवठयामध्ये रु. २०,३०,९३४ (वीस लाख तीस हजार नऊशे चौतीस) रूपयांचा गैरव्यवहार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मिरा भाईंदर शहराच्या भुयारी गटार योजनेत पाईप पुरवठा देयकामध्ये अनियमितता झाल्याची तक्रार माहे मे, २०१७ मध्ये मिरा भाईंदर महानगरपालिकेस प्राप्त झाली होती.

(२), (३), (४) • सदरची तक्रार ही पाईप पुरवठ्याच्या देयकामध्ये रु.१०,७८,५१६/- ची अनियमितता झाल्याबाबत होती.

• सदर तक्रारीच्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आली होती.

• सदर चौकशीअंती सदरची तक्रार चूकीची असून अशी कोणतीही अनियमितता झाली नसल्याबाबतचा निष्कर्ष निघाला असलेबाबतचा अहवाल आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी शासनास सादर केला आहे.

-----------------

**नालासोपारा येथे इंटरनेटवरील ॲपव्दारे बनावट कागदपत्रे बनवणा-यांना अटक करण्यात आल्याबाबत**

**(२९) * ८९३११ श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नालासोपारा (जि. पालघर) येथे इंटरनेटवरील ॲपव्दारे बनावट आधारकार्ड, पॅनकार्ड, पारपत्र आणि इतर कागदपत्रे बनवणा-या तिघांना दिनांक ३१ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास पोलीसांनी छापा टाकून अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी चौकशी केली असून आरोपी विरुध्द तुळींज पोलीस ठाणे, येथे गु.र.क्र. २९०/१७ भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६८, ३४ अन्वये गुन्हा नोंद केला आहे. या गुन्ह्यातील ३ आरोपींना अटक करण्यात आली असून गुन्हा तपासाधिन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनीमार्फत राज्यातील महसूल विभाग आणि महत्वाचे जिल्हे विमान सेवेव्दारे जोडणेबाबत

**(३०) * ८५०१७ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने विमान सेवेव्दारे महाराष्ट्राच्या विकासाला चालना देण्यासाठी सन २००२ मध्ये महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी (एमएडीसी) स्थापन करुन राज्यातील विमानतळाची उभारणी, देखभाल व विकास करण्याचे काम कंपनीस दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनी स्थापन करतांना राज्यातील प्रत्येक महसूल विभाग आणि महत्वाचे जिल्हे विमान सेवेव्दारे जोडण्याचा कार्यक्रम राबविण्यासाठी कंपनीला १६८८ कोटी रुपये देऊनही अद्याप एकही विमान उडू शकले नाही असा ठपका कॅगच्या अहवालात ठेवण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, विमान कंपनीव्दारे ग्रिनफिल्ड विमानतळ, ब्राऊनफिल्ड प्रकल्प आणि गडचिरोली जिल्हयात हेलिपोर्ट उभारण्याबाबतच्या कामासही विलंब झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य शासनाने सदर कामांसाठी कंपनीला रु. ३६३.१७ कोटी रुपयाची रक्कम दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर कंपनीच्या ढिसाळ व हलगर्जी कामकाजाच्या कार्यपध्दतीबाबत चौकशी करण्यात आली आहे काय व त्यानुषंगाने सदरहू कामे तातडीने होण्याबाबत सदर कंपनीवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) राज्यातील तीन ग्रीनफील्ड व सात ब्राऊनफिल्ड विमानतळांचा विकास व विस्तार करण्याचे काम महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस देण्यात आले असून त्याअनुषंगाने कार्यवाही सुरु आहे. तथापि, सदर विमानतळे विकसित करण्याबरोबरच मिहान प्रकल्पाचा विकास व प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन तसेच

प्रकल्पग्रस्तांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे इ. करिता कंपनीला दि.३१.०३.२०१६ पर्यंत एकूण रु.१६८८ कोटी देण्यात आले आहेत. तसेच, गडचिरोली जिल्ह्यात हेलिपोर्ट उभारण्याचे काम महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस देण्यात आलेले नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**घोट गावाजवळ (ता.पनवेल, जि.रायगड) असलेले डंपिंग ग्राउंड बंद करण्याबाबत**

**(३१) * ८५६९८ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल महानगरपालिका हद्दीतील घोट गावाजवळ (ता.पनवेल, जि.रायगड) असलेल्या डंपिंग ग्राउंडवर सिडको वसाहतीतील टाकण्यात येणाऱ्या कचऱ्याच्या दुर्गंधीमुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असल्याचे माहे जून, २०१७ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त डंपिंग ग्राउंडवर टाकण्यात येणाऱ्या कचऱ्यामुळे पावसाळयाच्या सुरूवातीलाच उक्त परिसरात २० रहिवाशांना डेंग्युची लागण होवून श्वसनाचेही विकार मोठया प्रमाणात आढळून आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिडको प्रशासनाने डंपिंग ग्राउंड बंद करण्याचे आश्वासन देवूनसुध्दा अद्यापही डंपिंग ग्राउंड बंद केले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून घोट गावाजवळील डंपिंग ग्राउंड बंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) नाही.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या मान्यतेने सिडको महामंडळाने घनकचरा प्रक्रिया केंद्रे विकसित केली आहेत. सदर घनकचरा प्रक्रिया केंद्रामध्ये कचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया केली जाते. जिल्हा हिवताप अधिकारी, अलिबाग यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार घोट, करवले, भोईरपाडा, नागझरी चाळ, किरवले या प्रक्रिया केंद्राजवळील गावात माहे जुन, २०१७ मध्ये एकही डेंग्यु रुग्ण आढळून आला नाही.

(३) सिडको प्रशासनाने सदर डंपींग ग्राऊंड बंद करण्याचे कोणतेही आश्वासन दिलेले नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन सुधार मंडळात अनेक कंत्राटदारांनी बनावट चाचणी प्रमाणपत्र सादर केल्याबाबत**

**(३२) * ८४९४५ अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन सुधार मंडळात अनेक कंत्राटदारांनी बनावट चाचणी प्रमाणपत्र सादर करून देयके मंजूर करून घेतली असल्याचे तसेच सदरची कामे अधिकारी व कंत्राटदाराच्या संगनमताने झाल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी २० कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकण्याची प्रक्रिया सुरु असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत विशिष्ट समिती नेमून सखोल चौकशी करण्यात येणार आहे काय तसेच चौकशीमध्ये दोषी आढळणाऱ्या अधिकारी व कंत्राटदारांवर काय कारवाई करण्यात आली आहे वा येणार आहे,

(४) असल्यास, असे प्रकार होऊ नयेत व निविदा प्रक्रिया संपूर्ण पारदर्शक राहील यासाठी प्रशासन काय उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) होय, २० कंत्राटदारांना काळया यादीत टाकण्याची प्रक्रिया पूर्ण झालेली आहे.

(३) मुख्य अधिकारी, झोपडपट्टी सुधार मंडळाच्या प्राप्त अहवालानुसार २० कंत्राटदारांना काळया यादीत टाकण्याची प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. त्यामुळे चौकशी करण्यासाठी विशिष्ट समिती नेमण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. त्याचप्रमाणे संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याकरिता सचिव, प्राधिकरण तसेच मंडळ स्तरावर कार्यावाही चालु आहे.

(४) मुख्य अधिकारी, झोपडपट्टी सुधार मंडळाच्या प्राप्त अहवालानुसार, निविदा प्रक्रिया ई-निविदा पध्दतीने संपूर्णपणे पारदर्शकपणे राबविली जात आहे. मालाचे चाचणी प्रमाणपत्र प्रयोगशाळेतून थेटपणे झोपडपट्टी सुधार मंडळाकडे पाठविण्यात येते. इत्यादी उपाययोजना करण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाहूर (पश्चिम) येथील पिरॅमल रिअल्टी या विकासकाने ११० पुनर्रोपित झाडे लावल्याची खोटी माहिती वृक्ष प्राधिकरणाला दिल्याबाबत

**(३३) * ८५२५५ श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाहूर (पश्चिम) येथील पिरॅमल रिअल्टी या विकासकाने इमारतीच्या बांधकामासाठी त्या परिसरात असलेली पिंपळ, अशोक, आंबा, नारळ व सुबाबुळ अशी अनेक वर्षांपासून उभ्या असलेल्या २३८ झाडांची कत्तल करतांना महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरणाने विकासकावर कत्तल केलेल्या वृक्षांच्या बदल्यात ३० दिवसात नवीन झाडांचे पुनर्रोपन करण्याची अट घालूनही सदर विकासकाने ११० पुनर्रोपित झाडे लावल्याची खोटी माहिती वृक्ष प्राधिकरणाला देऊन दिशाभूल केली असल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २१ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.नगरविकास राज्यमंत्री यांच्याकडे करुन सदर विकासकावर व त्याला अंतर्गत मदत करणाऱ्या महानगरपालिकेच्या विभागीय अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने या प्रकरणी विकासक व संबंधित महानगरपालिका विभागीय अधिकारी यांची चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशा स्वरुपाचे निवेदन प्राप्त झाले आहे हे खरे आहे.
(२) नाहूर (पश्चिम) येथील मे. पी. आर. एल. डेव्हलपर्स प्रा. लि. या विकासकास न.भु.क्र. ४९१ए/५, ४९१ए/६ या भूखंडावर प्रस्तावित इमारतीच्या विकासकामामध्ये अडथळा ठरणारे २३ वृक्ष कापणे, २१५ वृक्ष पुनर्रोपित करणे व इतर २९२ वृक्ष आहे तसेच ठेवण्याकरिता वृक्ष प्राधिकरणाच्या मंजुरीने परवानगी देण्यात आली आहे.

सदर परवानगीनुसार विकासकाने २३ झाडांची कापणी केली असून, त्याबदल्यात ६६ नवीन झाडे लावण्यात आलेली आहेत. तसेच, पुनर्रोपणास परवानगी दिलेल्या २१५ झाडांपैकी १४५ झाडे पुनर्रोपित करण्यात आली आहेत.

सदर प्रकरणी विधानमंडळाच्या सन २०१७ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात उपस्थित लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने, वृक्षांचे पुनर्रोपणाच्या अनुषंगाने चौकशी करण्याच्या सूचना बृहन्मुंबई महानगरपालिकेस मे, २०१७ मध्ये देण्यात आल्या आहेत.

तसेच, वृक्षतोडीची परवानगी, वृक्षांच्या जीओ-टॅगिंगबाबतचा तपशील, वृक्षांचे पुनर्रोपण यांचा सर्वसमावेशक तपशील असलेले सर्वंकष संकेतस्थळ तयार करण्याचे निदेश मुंबई महानगर क्षेत्रातील महानगरपालिकांना मे, २०१७ मध्ये देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक व अहमदनगर जिल्हयातील आंदोलन केलेल्या शेतकऱ्यांवर दाखल केलेले गुन्हे मागे घेणेबाबत

**(३४) * ८५४३३ श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळगाव जलाल (ता. येवला जि.नाशिक) टोल नाक्यावर दिनांक १ व २ जून, २०१७ रोजी शेतमालाची लुट केल्याप्रकरणी ४४ शेतकऱ्यांवर पोलिसांकडून कलम ३०७, ३९४ व ३९५ अन्वये दरोडा, लुटमार, पोलिसांना जीवे मारण्याचा प्रयत्न इ. बाबत गंभीर गुन्हे दाखल केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येवला व निफाड (जि. नाशिक) या तालुक्यासह कोपरगाव (जि.अहमदनगर) तालुका येथील सुमारे २५०० संपकरी शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) मधील संपकरी शेतकऱ्यांवरील अन्यायकारक व खोटे गुन्हे मागे घेण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी गुन्हे मागे घेण्याबाबत नाशिक जिल्हयातील स्थानिक संघटनेकडून निवेदन प्राप्त झाले असून यासंदर्भातील पुढील कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई-पुणे जुन्या महामार्गावर हाळ गावच्या हद्दीतील म्हाडाला हस्तांतरीत केलेल्या जमिनीबाबत

**(३५) * ९०९०३ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे जुन्या महामार्गावर हाळ गावच्या हद्दीत १२० एकर जमिनीपैकी ४० एकर जमीन गोरगरिब आर्थिकदृष्टया मागासलेल्याना अल्प किंमतीत घरे मिळावी या उद्देशाने नगरपालिकेने भूसंपादन करुन म्हाडाला हस्तांतरित केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू जागा गोरगरिब आर्थिकदृष्टया मागासलेल्यांना अल्प किंमतीत घरे बांधण्याकरिता हस्तांतरित केली असतांनाही सदरहू जागा मुंबईतील बडया धनदांडग्या भूमाफिया व दलालांनी विकत घेऊन जास्त भावात विकण्यास सुरुवात केल्याचे नुकतेच माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

खोपोली नगरपरिषदेकडून सर्व्हे क्र.२७ ते ३३ येथील ७.६६ हेक्टर आर म्हणजेच १९.१५ एकर जमीनीचा ताबा म्हाडाला सन १९८४ मध्ये मिळालेला आहे.

(२) हे खरे नाही.

कोकण मंडळाने सदर वसाहतीच्या अभिन्यासामध्ये अल्प उत्पन्न गटासाठी १८८ भूखंड व अत्यल्प उत्पन्न गटासाठी १२० भूखंड अशी योजना सन १९८७ मध्ये

राबविलेली आहे. वितरणानंतर भूखंड धारकांना ताबा देऊन ५ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. तद्नंतर माहे मे-जून, २०१७ मध्ये २ भूखंड धारकांनी कोकण मंडळाकडून रितसर विक्री परवानगी घेऊन सदर भूखंडांची विक्री केलेली आहे. म्हाडाच्या प्रचलित धोरणानुसार नियमितीकरण शुल्क आकारुन हे दोन्ही भूखंड नियमित करण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये सोनोग्राफी मशिन्स खरेदीत झालेला गैरव्यवहार

**(३६) * ८७१३८ श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या १५ रुग्णालयांमध्ये १५ सोनोग्राफी मशिन्स बसविण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोनोग्राफी मशिन्सचा पूर्णक्षमतेने उपयोग होत नसतानाही ७० लाख रुपये खर्चून आणखी पाच मशिन्स मागविण्यात आल्या आहेत, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रत्यक्षात या मशिन्सची किंमत कमी असतानाही त्या जास्त किंमतीच्या दाखवून खरेदी करण्यात आल्याची धक्कादायक माहिती माहे मे, २०१७ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास आली, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व त्यानूसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) • पुणे महानगरपालिकेच्या १५ रूग्णालयांमध्ये आजपर्यंत एकूण १६ सोनोग्राफी मशिन्स बसविण्यात आलेली आहेत.

• सन २०१६-२०१७ पूर्वी खरेदी केलेल्या एकूण ११ सोनोग्राफी मशिन्स पुणे महानगरपालिकेच्या रूग्णालयात वापरात आहेत. तथापि आवश्यकतेनुसार सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात रू.१.५५ कोटी किंमतीची एकूण ५ सोनोग्राफी मशिन्स खरेदी करण्यात आलेली आहेत.

(३) • सोनोग्राफी मशिन्सची किंमत कमी असतांनाही जास्त किंमत दाखवून मशिन्स खरेदी केल्या आहेत अशा स्वरूपाची तक्रार सजग नागरिक मंच, पुणे यांनी दि.२२.५.२०१७ रोजी पुणे महानगरपालिकेकडे केली आहे. तसेच याबाबतचे वृत्त स्थानिक वृत्तपत्रात आले होते.

• सन २०१६-१७ मध्ये निविदा प्रक्रियेनंतर ५ सोनोग्राफी मशिन्स टर्न कि पध्दतीने खरेदी करण्यात आल्या असून त्यामध्ये कॉम्प्युटर, प्रिंटर, यु.पी.एस., कॉम्प्युटर टेबल्स, इंटरनेट कनेक्शन इत्यादी बाबी उपलब्ध आहेत.

• तसेच खरेदी केलेल्या ५ मशिन्सपैकी एका मशिनमध्ये इलॅस्टोग्राफी व इतर सॉफ्टवेअर, अतिरीक्त प्रोब (Probe) इत्यादी सुविधाही उपलब्ध आहेत.

• खरेदी केलेल्या मशीन्सचे दर बाजारभावानुसार योग्य असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**म्हाडाच्या संक्रमण शिबिरातील रहिवाशांच्या वास्तव्याच्या मूळ कागदपत्रांची नस्ती गहाळ झाल्याबाबत**

**(३७) * ९०८६६ श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील म्हाडाच्या संक्रमण शिबिरात वर्षानुवर्षे वास्तव्याला असलेल्या रहिवाशांच्या उपकरप्राप्त इमारतींमधील वास्तव्याच्या मूळ कागदपत्रांची नस्ती म्हाडाकडून गहाळ झाल्याची धक्कादायक माहिती माहे मे, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नस्ती गहाळ झाल्याने म्हाडाच्या पुनर्रचित इमारतीमध्ये नवीन घरे मिळण्याच्या हक्कापासून असंख्य रहिवाशी वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
दि. २७.०२.२०१३ व दि. २२.१०.२०१३ रोजीच्या जाहिरातीस अनुसरुन १४९७ अर्ज प्राप्त झाले होते. सदर १४९७ प्राप्त अर्जांवर निर्णय घेऊन प्रसिध्द केलेल्या जाहिरातीनुसार ११५१ अर्जदारांना अपात्र करण्यात आले. तसेच ३४६ अर्जदारांना पात्र करण्यात येऊन गाळे वितरण करण्यात आले. अपात्र अर्जदारांपैंकी केवळ ३६ प्रकरणे मूळ कागदपत्रे नसल्याने अपात्र करण्यात आली आहेत.
(३) व (४) सदर मूळ कागदपत्रांचा शोध घेण्यासाठी म्हाडा कार्यालयामध्ये व क्षेत्रीय कार्यालयामध्ये सन २०१४ मध्ये शोध मोहिम राबविण्यात आली असता ८० अर्जदारांपैंकी १२ प्रकरणांची मूळ कागदपत्रे उपलब्ध झाली आहेत. तसेच सदर प्रकरणी समितीद्वारे या कार्यालयातील अधिकारी/कर्मचाऱ्यांमार्फत तसेच क्षेत्रीय कार्यालयामार्फत नस्तींचा शोध घेण्याची मोहिम सुरु आहे. उर्वरित ३६ प्रकरणांपैकी मूळ नस्ती आढळून आल्यास समितीद्वारे पात्र/अपात्रतेचा फेरआढावा घेण्याची तरतूद ठेवली आहे.

-----------------

## मुंबईतील दादर, माहिम आणि प्रभादेवी परिसरातील सुमारे १९ इमारतीतील रहिवाशांना विकासकाने भाडे देण्याचे बंद केले असल्याबाबत

**(३८) * ८७७४५ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील दादर, माहिम आणि प्रभादेवी परिसरातील सुमारे १९ इमारतीतील रहिवाशांना पुनर्विकासासाठी विकासकाने इमारती रिकाम्या करुन रहिवाशांना पर्यायी वास्तव्याचे भाडे देण्याचे कबूल करुनही गेली दोन वर्षापासून रहिवाश्यांना

भाडे देण्याचे बंद केले असल्याची बाब रहिवाशांनी मा.गृहनिर्माण राज्यमंत्री यांच्या दिनांक २८ एप्रिल, २०१७ रोजी लेखी निवेदनाद्वारे निदर्शनास आणली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकासकाने रहिवाश्यांना भाडे न दिल्यामुळे १९ इमारतीमधील दोन हजाराहून अधिक कुटुंबे विस्थापित झाली आहेत, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्या विकासकाने इमारतींच्या विकासाला वा पुनर्बांधणीकरीता विलंब लावला आहे त्याच्यावर कोणती दंडात्मक कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) हे अंशत: खरे आहे.

असा पत्रव्यवहार सदर रहिवाश्यांमार्फत मा. राज्यमंत्री, गृहनिर्माण यांना केल्याची बाब खरी आहे. तसेच या इमारतीतील भाडेकरु/ रहिवाश्यांमार्फत विकासकांकडून भाडे मिळत नसल्याबाबत, काम बंद असल्याबाबत, तसेच काम धिम्यागतीने सुरु असल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

(३) याबाबत, म्हाडाने अर्धवट / रखडलेल्या अवस्थेत असलेल्या पुनर्विकास प्रकल्पासाठी शासन स्तरावर धोरण निश्चित करण्यासाठी प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे. सदर प्रस्तावामध्ये नाहरकत प्रमाणपत्र रद्द करुन म्हाडाने मालमत्ता म्हाड अधिनियम- १९७६ प्रकरण ५ कलम ४१ मधील तरतुदीनुसार भूसंपादित करुन, उर्वरित काम पुर्ण करण्याची तरतूद केलेली आहे. सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलडाणा शहरातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(३९) * ८५८६२ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा शहरातील तहसील चौक ते सर्क्यूर रोड, धाड रस्ता ते पाण्याची टाकी, बसस्थानक ते चिंचोले हॉस्पिटल, कारंजा चौक ते पोलीस कवायत मैदान, जनता चौक ते आठवडी बाजाराकडे जाणारा रस्ता, बसस्थानकामागील तानाजी नगर, सुवर्ण नगर, शास्त्री नगर, डी.एस.डी. मॉल जवळून दलाल ले आऊट

जयस्तंभ चौक हे रस्ते खड्डेमय व धोकादायक झाले असल्याची बाब दिनांक १ जून, २०१७ वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार रस्त्यांचे नुतनीकरण, मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुख्याधिकारी, नगरपरिषद बुलढाणा यांच्या अहवालानुसार बुलढाणा शहरातील नमुद रस्ते हे खड्डेमय झालेले असणे व त्यामुळे अपघाताला निमंत्रण देण्याची बाब वस्तुस्थितीला धरून नाही. तथापि, सदर रस्त्यांचा पृष्ठभाग काही पॅचेसमध्ये अंशत: खराब झालेला आहे. ही वस्तुस्थिती आहे.
(२) नगरपरिषद हद्दितील रस्ते सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औदयोगिक नगरी अधिनियम १९६५ च्या कलम ४९ (i) नुसार मुख्यत्वे नगरपरिषदेची आहे.

या व्यतिरिक्त शासनामार्फत वेळोवेळी रस्ता दुरूस्तीसाठी अनुदान उपलब्ध करून देण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भाईंदर व मोखाडा (जि.पालघर) येथे घडलेल्या लैंगिक अत्याचाराच्या घटना**

**(४०) * ८७०१५ श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भाईंदर (जि.पालघर) येथे अल्पवयीन मुलीवर ८ जणांनी लैंगिक अत्याचार केल्याची घटना दिनांक १५ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) तसेच मोखाडा (जि.पालघर) येथे कालीका मातेला बळी देण्याची धमकी देऊन भोंदूबाबाने तरूणीवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना दिनांक १३ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे अहे काय,

(३) असल्यास, सदर दोन्ही प्रकरणांची शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर घटनांमधील आरोपींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) पिडीत मुलीने दिलेल्या फिर्यादी नुसार नवघर पोलीस ठाण्यात गु रजि क्र १६०/२०१७ भादविस कलम ३७६(२) (एन),३७६(ड),३७७,५०६,३४ सह लैंगिक अत्याचारा पासून बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४,६ प्रमाणे दिनांक १४/४/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

मोखाडा येथे कालीका मातेला बळी देण्याची धमकी देऊन लैंगिक अत्याचार करण्याच्या घटनेमध्ये मोखाडा पोलीस ठाणे येथे दिनांक १०.०५.२०१७ रोजी गु.र.क्र.१८/२०१७ भादविसं कलम ३६३, ३६६, ३७६, ५०६, ४२०,३४३,१२०(ब) सह महाराष्ट्र नरबळी व इतर अमानुष, अनिष्ठ व अघोरी प्रथा व जादुटोणा प्रतिबंध घालण्यासाठी व त्याचे समुळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम २०१३ मधील क्र.३० कलम २ (१) ख चा ८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) भाईंदर येथिल दाखल गुन्ह्यात एकूण ५ आरोपी विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच १ विधी संघर्षग्रस्त बालक याला मा. बाल न्यायालय,भिवंडी यांनी योग त्या शर्ती व अटीवर जामीन मंजूर केला आहे. सदर गुन्ह्याचा अधिक तपास चालू आहे.

मोखाडा येथिल दाखल गुन्ह्यात एकूण ११ आरोपींना अटक केली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास चालु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे धामणे (ता.मावळ, जि.पुणे) येथे वारकरी कुटुंबातील तिघांची दरोडेखोरांनी हत्या केल्याबाबत

**(४१) * ८७१२० श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे धामणे (ता. मावळ, जि. पुणे) येथे सशस्त्र दरोडेखोरांनी घरावर केलेल्या हल्ल्यात वारकरी संप्रदायातील जेष्ठ टाळकरी, त्यांची पत्नी व मुलाची हत्या करण्यात आल्याची घटना दिनांक १९ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर घटनेत दोन जण जखमी झाले असून त्यात २५ वर्षीय महिला गंभीर स्वरूपात जखमी झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर दरोडेखोरांना अटक करुन त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मौजे धामणी (ता.मावळ, जि.पुणे) येथे सशस्त्र दरोडेखोरांनी घरावर केलेल्या हल्ल्यात वारकरी संप्रदायातील जेष्ठ टाळकरी व त्यांची पत्नी आणि मुलाची हत्या करण्यात आल्याची घटना दिनांक २५ एप्रिल, २०१७ रोजी घडली आहे.

(२) सदर घटनेत दोन जण जखमी झाले असून त्यामध्ये एक २६ वर्षीय महीला व एक दिड वर्षाची मुलगी यांचा समावेश आहे.

(३) व (४) सदर घटनेत दोन पुरूष व एक महीलेची हत्या करण्यात आली असून एक महीला आणि एक दिड वर्षाची मुलगी जखमी झाली आहे.तसेच सदर घटनेतत रू. १,७४,०००/- चा माल जबरीने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी अकरा आरोपींविरूद्ध मौजे धामणे ता . मावळ जि.पुणे येथे घडलेल्या घटनेबाबत तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १४५/२०१७ भादंवि ३९५,३९६,३९७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे तसेच सदर गुन्हयातील अकरा आरोपींना अटक करण्यात आली असून आरोपींकडून ३५,०००/- रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत.गुन्हा तपासावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**फडणीस ग्रुप ऑफ कंपनीच्या संचालकांनी गुंतवणुकदारांची फसवणूक केल्याबाबत**

**(४२) * ८५६४१ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्थिक गुंतवणुकीसंबंधीच्या वेगवेगळया योजनांमधून अधिक व्याज दराचा परतावा देण्याचे आमिष दाखवून फडणीस ग्रुप ऑफ कंपनीच्या संचालकांनी गुंतवणुकदारांची फसवणुक केल्याची घटना नुकतीच माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी ठाणे शहरातील नौपाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळुन आले व तदनुसार उक्त फडणीस समुहाच्या संचालकांला अटक करण्याबाबत व फसवणूक झालेल्या गुंतवणूकदारांचे पैसे परत मिळवुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) होय,

(४) सदरहू प्रकरणी नौपाडा पोलीस स्टेशन ठाणे येथे गु.र.क्र.१४५/२०१७ भा.द.वि.कलम ४२०, ४०९, १२० (ब) सह महाराष्ट्र ठेवीदारांच्या वित्तीय संस्थेच्या हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ चे कलम ३ प्रमाणे गुन्हा दाखल केलेला असून सदर गुन्हयाचा तपास आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर करीत आहे. सदर गुन्हयात दोन आरोपींना अटक केली आहे.  तसेच कंपनीच्या नावे असलेली बँक खाती गोठविणेबाबत बँकाना व त्यांची मालमत्ता संरक्षित करणेबाबत संबंधित प्राधिकारी यांना कळविले आहे.

सदरचा गुन्हा तपासावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बांधकाम कामगारांच्या कल्याणाकरिता जमा करण्यात आलेला निधी शासनाकडे पडून असल्याबाबत

**(४३) * ८५०६७ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विविध ठिकाणी बांधकाम करणाऱ्या कामगारांच्या कल्याणासाठी मागील ५ वर्षांकरिता जमा करण्यात आलेला ५ हजार कोटीपेक्षा अधिक निधी शासनाकडे पडून असल्याबाबतची बाब माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या माध्यमातुन कामगारांचे कल्याण व्हावे या उद्देशाने, शासकीय, निमशासकीय आणि खाजगी बांधकाम करणाऱ्या संस्थांनी आपल्या प्रकल्पाच्या एकुण खर्चाचा एक टक्का सेस हा कल्याण मंडळात जमा करणे बंधनकारक केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेतुन कामगारांच्या कुटूंबीयांच्या कल्याणसाठी एकुण २२ योजना आखण्यात आलेल्या होत्या तसेच बांधकाम कामगारांना सन २०१४ मध्ये गृहोपयोगी साहित्य खरेदीकरिता ३ हजार रुपये व माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये ५ हजार रुपये बोनस देण्याचे शासनाने मान्य करुनही अद्यापपर्यंत त्यांची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या कामगारांच्या कल्याणासाठी उभारण्यात आलेला निधी त्यांच्या कल्याणाकरीता न वापरता शासनाकडे अखर्चित रहाण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करून त्यानुसार निधी अखर्चित रहाण्यास जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांच्या व त्यांच्या कुटुंबियांच्या कल्याणासाठी मंडळामार्फत एकूण २३ योजना राबविल्या जात असून गृहोपयोगी वस्तू खरेदीकरिता एकूण १,०७,६६३ नोंदीत बांधकाम कामगारांना प्रति रु.३,०००/- प्रमाणे अर्थसहाय करण्यात आले आहे. मंडळाकडील नोंदीत कामगारांना रु. ५०००/- इतकी रक्कम बोनस म्हणून देण्याबाबतची योजना अस्तित्वात नाही.
(४) कामगारांच्या कल्याणासाठी उभारण्यात आलेला निधी मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येत असलेल्या योजनांच्या माध्यमातून नोंदीत कामगार व त्यांच्या कुटुंबियांसाठी वापरण्यात येत आहे.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील शासकीय मुलींच्या वसतीगृहातील अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याबाबत

**(४४) * ८६२७८ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली**

**पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील शासकीय मुलींच्या वसतीगृहातून माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान पळालेल्या ४ अल्पवयीन मुलींपैकी एकीचे सिताबर्डी पोलीस ठाण्यासमोरून अपहरण करून तिच्यावर रात्रभर अमानुष लैंगिक अत्याचार केल्याचा प्रकार दिनांक १६ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर शहरासह नागपूर जिल्हयात दररोज अल्पवयीन मुली, बालिका, महिलावर दररोज लैंगिक अत्याचाराच्या घटना घडत असून गत पाच महिन्यात १०० च्यावर लैंगिक अत्याचाराच्या घटना घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गंभीर प्रकरणाची शासनाने चौकशी करून दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, लैंगिक अत्याचाराच्या घटना प्रतिबंधीत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय,हे खरे आहे.

(२) हे, खरे नाही.

(३) सिताबर्डी पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि क्र १५३/१७ कलम ३६३, ३६६(अ), ३७६(ड), १२०(ब), ५०६(ब), १०९, ११८ भादंवि सहकलम ६,१७ लैंगीक अपराधांपासून बालकांचे सरंक्षण अधिनियम अन्वये दिनांक २३/०४/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयात ११ आरोपींना अटक करण्यात आलेले आहे.तसेच, गुन्हयातील सर्व आरोपींना न्यायालयीन कोठडी आहे.

(४) पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांच्यातर्फे पोलीस आयुक्त वेबसाईट, Twitter, Face-Book, Whats up Group, १०० Number, DCRMS च्या २० लाइन्स कार्यान्वित करण्यात आल्या असून सर्व पोलीस ठाण्यातील ४५० पोलीस वाहनांवर GPS सिस्टीम बसविण्यात आली आहे.सर्व पोलीस स्टेशनचे Twitter Account उघडण्यात आले आहेत.

पोलीस आयुक्तालयात एक मिडीया व्हॅन तयार करण्यात आली असून महिला व बालकांविरुध्द घडणा-या गुन्हयांबाबत शाळांमध्ये व सार्वजनिक ठिकाणी जनजागृती करण्यात येत आहे. तसेच शाळा, कॉलेजस, निर्जनस्थळी सतत दामिनी पथकाव्दारे पेट्रोलिंग करण्यात येत आहे.

तातडीने कारवाई करण्यासाठी प्रतिसाद ॲप, वाहन चोरी ॲप, पोलीस मित्र ॲप तयार करण्यात आले असून त्यामाध्यमांव्दारे जनतेच्या तक्रारींचे निवारण करण्यात येत आहे.

नागपूर शहरात एकूण २९ सी.आर. व्हॅन आणि ई- पेट्रोलिंग मोबाईल कार्यान्वित करण्यात आल्या असून प्रत्येक मोबाईल व एका ॲपव्दारे सुचना देण्यात येऊन त्याच्या हालचालींची माहिती पोलीस ठाण्यास प्राप्त होते.

सार्वजनिक ठिकाणी इशारेबाजी, असभ्यवर्तन करणारे इत्यादींविरुध्द जानेवारी ते जून २०१७ पावेतो १७०३ केसेस ११०/११७ मुंबई पोलीस कायदयान्वये कारवाई करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरात गॅस्ट्रोची साथ पसरल्याबाबत

**(४५) * ८८९६७ प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात माहे मे, २०१७ च्या सुमारास अनेक ठिकाणी अपूरा व दूषित पाणीपुरवठा होत असल्याने शहरात गॅस्ट्रोची साथ पसरल्याचे समोर आले असून

माहे एप्रिल, २०१७ मध्ये ९१६ रुग्ण आढळून आल्याची बाब मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाद्वारे दिलेल्या माहितीमध्ये नमूद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गॅस्ट्रो हा दूषित पाण्याच्या संसर्गामुळे होणारा आजार असून मागील वर्षी गॅस्ट्रोच्या रुग्णांना अटकाव घालण्यात महानगरपालिकेला अपयश आल्याने सन २०१६-१७ या संपूर्ण वर्षात ३५४० गॅस्ट्रोच्या रुग्णांची नोंद करण्यात आली होती, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, पावसाळ्यापूर्वी रुग्णांची वाढती आकडेवारी पाहता पावसाळा सुरु झाल्यानंतर रुग्णांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता लक्षात घेता गॅस्ट्रोची साथ आटोक्यात ठेवण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या साथ रोग नियंत्रण कक्षात एप्रिल, २०१७ मध्ये ९१६ गॅस्ट्रो रुग्णांची नोंद झाली आहे ही वस्तुस्थिती आहे.

(२) गॅस्ट्रो हा आजार दुषित पाण्याच्या संसर्गामुळे तसेच, दुषित पाणी व दुषित अन्न यांचे सेवन आणि वैयक्तिक स्वच्छतेचा अभाव इत्यादी कारणांमुळे पसरतो.

महानगरपालिकेच्या आरोग्य खात्याकडून प्राप्त माहितीच्या आधारे सन २०१५-१६ या वित्तीय वर्षामध्ये १०९७२ व सन २०१६-१७ या वित्तीय वर्षात ९७६४ गॅस्ट्रोच्या रुग्णांची नोंद झाली आहे.

(३) जलजन्य आजाराच्या प्रतिबंध व नियंत्रणासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पुढीलप्रमाणे उपाययोजना राबविण्यात येतात :-

- महानगरपालिकेच्या २४ विभागांतील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या कार्यालयांमार्फत पिण्याच्या पाण्याचे दैनंदिन सर्वेक्षण करण्यात येते.
- अयोग्य पाण्याचा नमुना आढळलेल्या व जलजन्य आजाराचा रुग्ण आढळलेल्या परिसराचे सर्वेक्षण करण्यात येते.
- सर्वेक्षण आढळलेल्या रुग्णांमध्ये शुष्कीकरण टाळण्याकरिता जलसंजीवनीचे वाटप करण्यात येते.
- आवश्यकतेनुसार रुग्णांना जवळच्या दवाखाना / रुग्णालयात पुढील उपचारासाठी संदर्भित करण्यात येते.

• पाणी उकळून व गाळून पिण्याबाबत जनजागृती करण्यात येते.

• पाण्याच्या अतिरिक्त शुध्दीकरणासाठी क्लोरीन गोळयांचे वाटप करण्यात येते.

• विभागांतील पदपथावरील उघडे अन्नपदार्थ, जास्त पिकलेली फळे, धुळ व माशा बसलेले अन्नपदार्थ व सरबतासारखी पेये नष्ट करण्यात येतात.

• फेरीवाल्यांकडील पाणी व बर्फाचे नमुने तपासण्यासाठी विशेष मोहिम राबविण्यात येत असून, अयोग्य नमुना आढळलेल्या आस्थापनांवर कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत घरांची १० वर्षाच्या आधीच विक्री केलेले व खरेदी केलेल्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याबाबत

**(४६) * ८५७४० श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत बांधण्यात आलेल्या झोपडीधारकांसाठीच्या घरांची १० वर्षाच्या आधीच विक्री व खरेदी केलेल्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत हजारो लोकांना निष्कासन नोटीसा देण्यात आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरच्या गंभीर प्रश्नांची दखल घेऊन यावर तोडगा काढण्यासाठी शासनाने मंत्रिमंडळाची उपसमिती स्थापन केल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यबाबत कोणता निर्णय घेण्यात आला व त्यानुसार कोणती कार्यवाही केली,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) अंशत: खरे आहे.

(२) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पुनर्वसन सदनिकांमध्ये अनाधिकृत वास्तव्य करणाऱ्या झोपडीधारकांच्या संदर्भात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने सर्वसाधारण सर्वेक्षणापूर्वीची २,५८१ प्रकरणे व याचिका क्र.१६८५/२०१४ मध्ये मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार केलेल्या सर्वसाधारण सर्वेक्षणानुसारची ११,१०१ अशा एकूण १३,६८२ प्रकरणांपैकी १३,४३४ प्रकरणे निष्कासनाची कार्यवाही करण्यासाठी संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याकडे पाठविली असल्याचे व संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांकडून अधिनियमाच्या तरतुदीनुसार कार्यवाही सुरु असल्याचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(३) व (४) गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय दि.०९.०१.२०१७ अन्वये मंत्रीमंडळ उपसमिती स्थापन करण्यात आली आहे. सदर मंत्रीमंडळ उपसमितीच्या निर्देशानुसार विधि व न्याय विभागाच्या सल्ल्याने विविध मुद्यांची तपासणी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे येथील लैंगिक अत्याचाराच्या घटनांबाबत

**(४७) * ८९४२९ श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील तीन हात नाका येथून रिक्षात बसलेल्या एका २३ वर्षीय तरुणीवर चालत्या रिक्षातच लैंगिक अत्याचार करुन सदर तरुणीने जोरदार प्रतिकार केल्याने तिला चालत्या रिक्षातून बाहेर फेकण्यात आल्याची गंभीर घटना दिनांक ७ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास रात्री निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मुलगी गंभीर जखमी झाली असून या प्रकरणी नौपाडा पोलीस ठाण्यात अपहरण व विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच ठाणे जिल्ह्यातील कल्याण- शीळ रोडवरील टाटा पॉवर जवळ एका अल्पवयीन विद्यार्थिनीचे रिक्षातून अपहरण करण्याचा प्रयत्न करत तिचा विनयभंग केल्याची गंभीर घटना दिनांक १२ जून २०१७ रोजी वा त्या सुमारास घडली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त दोन्ही घटनांबाबत चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) तिन हात नाका येथिल घटनेबाबत नौपाडा पो स्टे मध्ये गु.र.नं. २०३/१७ भादविक ३०७,३६३,३५४ ब,३२५,५०६(२),३४ प्रमाणे गुन्हा दाखल केलेला असून त्यामध्ये दोन आरोपी अटकेत आहे. गुन्हा तपासावर आहे.
कल्याण - शीळ फाटा येथिल घटनेबाबत मानपाडा पो स्टे गु र.नं ३५४/२०१७ भा. दं वि. कलम ३५४(अ) ३६३ बालकांचे लैंगिक अत्याचारा पासून संरक्षण कायदा कलम ८ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. यामध्ये दोन आरोपी अटकेत आहे. गुन्हा तपासावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात मायक्रो फायनान्स कंपनीकडून लोकांची होत असलेली फसवणूक

**(४८) * ८५२८७ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या प्रलोभनाला राज्यातील बहुतांश महिला बचत गट बळी पडले असून पैशाची वसूली करण्यासाठी मायक्रो

फायनान्स कंपन्याकडून करण्यात येणाऱ्या जबरदस्तीने महिला बचत गटात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर जिल्हयात सुमारे ७० हजार महिला बिडी कामगारांची महिला बचत गटाच्या नावाखाली मायक्रो फायनान्स कंपन्या आर्थिक फसवणूक करीत असल्याची माहिती दिनांक ११ जून २०१७ रोजी वा त्या सुमारास निर्देशनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मायक्रो फायनान्स कंपन्याच्या कर्ज वसूलीच्या तगादयाने दिनांक १२ एप्रिल, २०१७ रोजी श्रीमती भारताबाई श्रीनिवास गणपा रा. विनोबा भावे झोपडपट्टी दत्तनगर सोलापूर या बिडी कामगार महिलेने आत्महत्या केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार शासनाने सदर कंपनीविरूद्ध कारवाई करण्याबाबत तसेच राज्यात मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या कारभाराला प्रतिबंध घालण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) लघु वित्तीय संस्था लोकांना दिलेले कर्ज वसूल करत असताना लोकांना धाकदपटशा करणे, धमक्या देणे, दिलेले कर्ज जबरदस्ती वसूल करणे असे प्रकार करत असतील तर, अशा लघु वित्तीय संस्था विरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात यावी याबाबत शासनाने दि.१३/०४/२०१७ च्या पत्रान्वये सर्व विभागीय आयुक्त व पोलीस महासंचालक यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(२) सोलापुर शहरात गुंतवणुकदारांची फसवणुक करत असल्याचे आढळून आल्याने जेलरोड पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ६८/२०१५ भा.दं.वि.कलम ४०६,४२०,३४ सह एम.पी.आय.डी. अधिनियम १९९९ प्रमाणे मायक्रो फंडिंग ॲण्ड लिजींग या कंपनी विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) व (४) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी जेलरोड पोलीस स्टेशन येथे अ.म.नं.१९/१७ सी.आर.पी.सी. १७४ प्रमाणे अकस्मात मयत दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणाचा तपास सुरु आहे.

(५) मायक्रो लिझींग अँन्ड फंडिंग लि. या कंपनीच्या गैरकारभाराला प्रतिबंध घालण्याच्या दृष्टीने सदर संस्थेच्या जेलरोड पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ६८/२०१५ भा.दं.वि.कलम ४०६,४२०,३४ सह एम.पी.आय.डी. अधिनियम १९९९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यामध्ये कंपनीची मालमत्ता शासन अधिसुचना दि.१६/०६/२०१७ अन्वये जप्त करण्यात आली आहे.

(६) विलंब झालेला नाही.

-----------------

## मुंबई शहरात मोडकळीस आलेल्या इमारती आणि जुन्या चाळींच्या पुनर्विकासात भूमिपुत्रांना परवडणारी घरे देणारी विकास नियमावली आणण्याबाबत

**(४९) * ८४९३९ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात मोडकळीस आलेल्या इमारती आणि जुन्या चाळींच्या पुनर्विकासात भूमिपूत्रांना मुंबई बाहेर काढू नका तसेच सर्वसामान्यांना परवडणारी घरे देणारी विकास नियमावली आणा अशी मागणी मुंबईतील लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक ४ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :**(१) व (२) विकास नियंत्रण नियमावलीमध्ये मुंबई बेट शहरातील उपकर प्राप्त इमारतींची पुर्नबांधणी / पुर्नविकास विकास नियंत्रण नियमावलीच्या विनियम क्रमांक ३३(७), ३३(९) अन्वये होतो. ज्यामध्ये विद्यमान पात्र ताबेदारांच्या पुनर्वसनाच्या बदल्यात प्रोत्साहनपर चटई क्षेत्र निर्देशांकाची तरतूद आहे. तसेच जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतींच्या बाबतीत विकास नियंत्रण नियमावलीच्या विनियम क्रमांक ३३(६) मध्ये तरतूद आहे.

नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ३७ (१ कक) अन्वये क्र.टिपीबी/४३१५/प्र.क्र.१२८/२०१५ /नवि-११ दि. २.०१.२०१७ रोजी बिगर उपकर प्राप्त असलेल्या भाडेकरु व्याप्त मुंबई शहर व उपनगरातील इमारतींच्या पुर्नविकासाबाबत फेरबदलाची सूचना प्रसिध्द केली आहे. ज्यामध्ये विद्‌यमान पात्र ताबेदारांच्या पुनर्वसनाच्या बदल्यात ५० टक्के प्रोत्साहनपर चटई क्षेत्र निर्देशांकाची तरतूद प्रस्तावित आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेचा विकास आराखडा पुनर्रचनेच्या प्रक्रियेमध्ये असून महानगरपालिकेने प्रसिध्द केलेल्या प्रारुप विकास नियंत्रण नियमावली २०३४ मध्ये उपरोक्त विनियम क्र. ३३(७) व ३३(९) या तरतूदींचा अंतर्भाव आहे. तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम २८ अन्वये गठीत नियोजन समितीने सुनावणी दिली असून त्यांनी प्रारुप विकास नियंत्रण व प्रोत्साहक नियमावली २०३४ मध्ये उपरोक्त नमूद केलेल्या दि. २.०१.२०१७ च्या शासन अधिसूचनेचा विनियम ३३(६) (अे) अन्वये अंतर्भाव करण्याची शिफारस केली आहे. प्रारुप विकास नियंत्रण नियमावली २०३४ मध्ये परवडणारी घरे उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातून विशेष विकास पटटा-२ मधील परवडणा-या गृहनिर्माणाकरिता विनियम क्र. ३३(८) व ३३(२०) अन्वये तरतूदी प्रस्तावित केल्या आहेत. तसेच परवडणा-या गृहनिर्माणाकरिता विकास आराखडयात जागा देखिल आरक्षित केल्या आहेत.

महानगरपालिकेच्या मंजुरीनंतर अंतिम प्रारुप शासनाकडे विकास आराखडा व विकास नियंत्रण नियमावलीच्या मान्यतेकरिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या तरतूदीनुसार सादर करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंधेरी (मुंबई) येथे राज्य शासन आणि पोलीस सेवेतील अधिका-यांच्या बदल्या करणा-या दलालांना केलेली अटक

**(५०) * ८४९७४ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम),**

**श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (मुंबई) येथून पोलीसांनी गृह व अन्य विभागातील अधिकाऱ्यांचे बदल्या करणारे रॅकेट चालवणारे विद्यासागर हिरमुखे, किशोर माळी, विशाल ओंबळे, रविंद्रसिंग उर्फ शर्मा या टोळीला दिनांक १ जून २०१७ रोजी वा त्या सुमारास अटक केल्याची बाब निदर्शनास आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आरोपिंकडून अनेक आक्षेपार्ह कागदपत्रे, स्टॅम्प इत्यादी साहित्यही जप्त करण्यात आले तसेच या आरोपींकडे ६ ते ७ लाखांची रोकड, ४० व १० कोटी लिहिलेले धनादेश तसेच मंत्रालयातील कागदपत्रे इत्यादी साहित्य जप्त करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय असल्यास तपासाचे निष्कर्ष काय आहेत तसेच सापडलेले दोन धनादेश हे कोणत्या बँकेचे व कोणत्या खातेदाराचे होते तसेच बदलीचा प्रयत्न करणाऱ्या अधिकाऱ्यांची नावे काय आहे व त्यांच्यावर कोणती कारवाई केली,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) आरोपींकडून आक्षेपार्ह कागदपत्रे, धनादेश (रु. ५ कोटीचे २ व रु. ४० लाखाचा १ धनादेश) व रु. ६,७०,०००/- इतकी रोख रक्कम मिळून आली आहे. ही बाब खरी आहे. परंतु मंत्रालयातील कोणतीही कागदपत्रे वा साहित्य जप्त करण्यात आलेले नाही.

(३) सदर प्रकरणी विमानतळ पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. २६/१७ भा.दं. वि. कलम ४१९, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १७०, १२० (ब) सह कलम ६६ (ड) आय. टी. ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असून सदर गुन्हा गुन्हे प्रकटीकरण शाखेकडे (गु.प्र.शा.गु.र.क्र. २४/१७) वर्ग करण्यात आलेला आहे.

गुन्ह्यात हस्तगत ३ धनादेशाचा तपशील :-

अ) ५ कोटी रकमेचे २ धनादेश- स्टेट बँक ऑफ इंडिया, खाते क्र. ३०६७५२६८७७४, चेक क्र. ८७२०९३ व ८७२०९४, खातेधारक- आरटीआय पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट.

ब) ४० लाख रकमेचा १ धनादेश - करुर वैश्य बॅक लि. खाते क्र. ४१११४१७४००००००२४१, चेक क्र. ००००0५, खातेधारक राकेश कुमार पांडे नमूद गुन्ह्यात ७ अटक आरोपींनी बदली संदर्भात व इतर प्रकरणी आमिष दाखवून फसवणूक केलेल्या व्यक्तींबाबत तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शासनाने घरेलू कामगार व बांधकाम मजुरांसाठी सुरु केलेल्या सन्मानधन योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(५१) * ९०२९२ श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विलासराव जगताप (जत), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने घरेलू कामगार व बांधकाम मजुरांसाठी सुरु केलेल्या सन्मानधन योजनेअंतर्गत सन २०११-१२ मध्ये ६.१२ कोटी रुपये, सन २०१२-१३ मध्ये निरंक, सन २०१३-१४ मध्ये १३.६० कोटी तर सन २०१४-१५ मध्ये १८.७५ कोटी एवढा निधी खर्च करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निधीपैकी २ कोटी ९३ लाख ७४ हजार ८०० रुपये पुणे जिल्ह्यासाठी तर १ कोटी ९० लाख ९९ हजार २०० रुपये रत्नागिरी जिल्ह्यासाठी वितरित करण्यात आला परंतु रत्नागिरी जिल्हयांमध्ये हा निधी बनावट लाभार्थ्यांच्या नावे वाटप करण्यात आला असल्याचे दिनांक २८ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गैरव्यवहाराची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, सदर चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळा अंतर्गत राज्यातील नोंदणीकृत घरेलू कामगारांसाठी मंडळाच्या निधीतून राज्यात सन्मानधन योज़ना सन २०१४-१५ करिता लागू करण्यात आली. सदर योजनेकरिता सर्व जिल्हयांना रू.१४,११,८४,४००/- इतकी रक्कम वितरीत करण्यात आली. त्यापैकी रू. १०,७०,९३,७०२/- इतकी रक्कम जिल्हा कार्यालयांतून खर्च करण्यात आली.

(२) हे अंशत: खरे असून सदर बाब जानेवारी २०१५ मध्ये निदर्शनास आली.
(३) व (४) सदर गैरव्यवहाराची कामगार आयुक्त कार्यालयातील अधिकाऱ्यांमार्फत प्राथमिक चौकशी करण्यात आली आहे. प्राथमिक चौकशी मध्ये दोषी आढळून आलेल्या संबंधित अधिकाऱ्यांविरूध्द शिस्तभंगाची कारवाई सुरू करण्यात आली असून संबंधितांना दोषारोपाचे ज्ञापन बजावण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## घाटकोपर (प.) (मुंबई) येथील हनुमान नगरातील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये विकासकाकडून गैरव्यवहार होत असल्याबाबत

**(५२) * ८६९४० श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटकोपर (प.) (मुंबई) येथील हनुमान नगरातील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये विकासकाकडून गैरव्यवहार सुरु असुन येथील स्थानिक नागरीकांवर अन्याय होत असल्याप्रकरणी येथील स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरीकांनी मा.मुख्यमंत्री, गृहनिर्माण मंत्री, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगरे तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेकडे दिनांक १ जून, २०१७ रोजी तसेच वारंवार तक्रारी केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार आतापर्यंत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) या योजनेबाबत तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.
(२) सदर योजनेबाबत लोकप्रतिनिधी तसेच "पार्कसाईट स्वयंविकास आंदोलन" यांनी शासनास सादर केलेल्या दि.१५.०३.२०१७ व दि.१७.०३.२०१७ च्या निवेदनाच्या अनुषंगाने अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण) यांच्या स्तरावर चौकशी सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील ४० शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्राकरिता "सीएनसी-मिलिंग" मशिन्सची केलेली खरेदी**

**(५३) * ८८२२१ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ४० शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात (आयटीआय) शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी सन २०१४ मध्ये ६ कोटी २५ लाख रूपये खर्च करून "सीएनसी-मिलिंग" मशिन्स खरेदी करण्यात आल्या होत्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, "पिन-ट्रेन" या दर्जेदार मॉडेलच्या मशिन्सचा पुरवठा करण्याचे बंधन असताना ऑक्सर कंपनीने या अटींचे उल्लंघन करून "मिल-ट्रेन" या दुय्यम दर्जाच्या मशिन्सचा पुरवठा सदर ४० आयटीआय संस्थांना करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाकडून या प्रकरणी चौकशी करून चौकशीच्या अनुषंगाने संबंधीत दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई व ठाण्यातील मध्यवर्ती कारागृहातील कैदयांच्या मुत्यूबाबत

**(५४) * ८४९५७ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील ऑर्थर रोड आणि ठाण्यातील मध्यवर्ती कारागृहात ४५ कैदयांचा मृत्यू झाल्याचे माहे जून २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, यातील बहुतांश कैदी एचआयवी व क्षयरोग या आजाराने मृत्यूमुखी पडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याचबरोबर, या तुरुंगात क्षमतेपेक्षा जास्त कैदी असल्याने तसेच आरोग्यसेवा तुटपूंजी असल्याने योग्य प्रकारे उपचार न मिळाल्याने येथे संसर्गजन्य रोग पसरण्याचे प्रमाण अधिक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन गृह विभागाने मध्यवर्ती कारागृहाच्या सुधारणेकरीता कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा यांचे अहवालानुसार मुंबई मध्यवर्ती कारागृहात ३८ व ठाणे मध्यवर्ती कारागृहात ३२ बंदयांचे मृत्यु जून, २०१४ ते जून, २०१७ या कालावधीत झाले आहेत.

(२) जून, २०१४ ते जून, २०१७ या कालावधीमध्ये २९ बंदी एचआयव्ही/क्षयरोगाने मृत्युमुखी पडले आहेत.

(३) मुंबई व ठाणे मध्यवर्ती कारागृह येथे क्षमतेपेक्षा तीन पटीने जास्त बंदी दाखल असले तरी कारागृहामध्ये आजारी बंद्यासाठी स्वतंत्र रुग्णालय असून कारागृह रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. कारागृहातील वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी यांचेमार्फत कारागृहातील आजारी

बंद्यांवर आंतररुग्ण/बाहयरुग्ण वैद्यकीय उपचार करण्यात येतात. तसेच आवश्यकता असल्यास पुढील उपचारासाठी शासकीय रुग्णालयात सुध्दा तातडीने पाठविण्यात येते.

आजारी बंदयाना शासकीय रुग्णालयातील तातडीने उपचार उपलब्ध होण्यासाठी टेलीमेडीसीन सुविधासुध्दा नव्याने सुरु करण्यात आली आहे.

कारागृह प्रशासनामार्फत वेळोवेळी आरोग्य शिबीरांचे आयोजन करण्यात येते. त्यामध्ये, बंदयाना त्वचारोग व इतर संसर्गजन्य आजारापासून बचाव होण्याकरीता प्रतिबंधात्मक औषधांचे वाटप व उपचार करण्यात येतात. तसेच संसर्गजन्य आजारी बंदयांचा इतर बंद्याशी संपर्क होऊ नये यासाठी त्यांना स्वतंत्र ठेवून वैद्यकीय उपचार केले जातात. त्यामुळे कारागृहातील आरोग्य सेवा तुटपुंजी असल्याने बंद्यांना योग्य पध्दतीने उपचार न झाल्यामुळे संसर्गजन्य रोग पसरण्याचे प्रमाण अधिक आहे, ही बाब खरी नाही.

(४) सदरहू प्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिकेमध्ये मा.न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार सर्वसमावेशक कारागृह सुधारणा सुचिवणेसाठी शासन निर्णय दि. ६ जून,२०१७ अन्वये मा.श्री.राधाकृष्णन, निवृत्त न्यायाधीश, उच्च न्यायालय यांच्या अध्यक्षतेखाली उच्च स्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. सदरहू समितीकडून सहा महिन्यात शासनास शिफारशी सादर करणे अपेक्षित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई विमानतळ परिसरातील उंचीच्या नियमांचे उल्लंघन करणा-या ४२७ इमारती आणि बांधकामे पाडून टाकण्याबाबत**

**(५५) * ८५२९०  श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विमानतळ परिसरातील उंचीच्या नियमांचे उल्लंघन करणा-या ४२७ इमारती आणि बांधकामे जमीनदोस्त करावीत वा त्यांची उंची कमी करावी असे आदेश दिनांक १२ एप्रिल, २०१७ रोजी मा.मुंबई उच्च न्यायालयाने भारतीय विमानतळ प्राधिकरण (एएआय), नागरी उड्डाण संचालनालय (डीजीसीए), मुंबई महानगरपालिका आणि अन्य नियोजन यंत्रणांना दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंधेरी (पूर्व) येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील एकाच क्षेत्रामध्ये ओम सिद्धिविनायक एस. आर. ए.गृहनिर्माण संस्था मर्या. योजनेस १८ माळ्यांची, ओंकार दर्शन एस. आर. ए.गृहनिर्माण संस्था मर्या. योजनेस १४ माळ्यांची व महाकाली दर्शन एस. आर. ए. गृहनिर्माण संस्था मर्या. योजनेस १२ माळ्यांची अशा प्रकारे आजूबाजूला असलेल्या योजनांमध्ये विमानतळ प्राधिकरणाने वेगवेगळ्या उंचीची परवानगी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन विमानतळ परिसरात उंचीच्या नियमांचे उल्लंघन करुन बांधकाम करणा-यांना व नियमबाबाह्य परवानगी देणा-या अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच, उंच बांधकामे निष्कासित करण्यात येणार असल्याने विस्तापित होणाऱ्यांच्या पुनर्वसनाबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाचे आदेशाचे अवलोकनात घेता भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांनी सन २०१०-११ मध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार तयार केलेल्या यादीनुसार एकंदर ११० बांधकाम प्रकरणामध्ये संचालक, नागरी उड्डाण संचालनालय यांनी नोटीसा बजावलेल्या आहेत. त्यासंदर्भात दोन महिन्याचे मुदतीमध्ये संचालक, नागरी उड्डाण संचालनालय यांनी अंतिम आदेश पारित करावेत असे आदेश दिलेले आहेत. त्याचप्रमाणे सन २०१५-१६ मधील सर्वेक्षणासंदर्भात अशा बांधकामाची यादी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ मर्यादित यांनी संचालक, नागरी उड्डाण संचालनालय यांना सादर केलेली आहे. त्यासंदर्भात संचालक, नागरी उड्डाण संचालनालय यांनी तीन महिन्याच्या मुदतीमध्ये अंतिम आदेश पारित करावेत

असे आदेश दिलेले आहेत. अशी बांधकामे ही हवाई वाहतूकीच्या मार्गामध्ये अडथळा ठरत असल्यास ती मालकांने अथवा नियोजन प्राधिकरणानी पाडून टाकावीत असेही आदेश दिलेले आहेत.

सदर अंतिम आदेश हे तातडीने अंमलबजावणीसाठी एअरक्राफ्ट (डिमॉलिशन ऑफ ऑब्स्ट्रक्शन कॉज्ड बाय बिल्डींग ट्रीज ॲक्ट) रुल्स १९९४ च्या खंड (vi) मधील तरतूदीनुसार जमीन मालकांसह जिल्हाधिकारी यांनाही बजावावेत असेही आदेश मा. उच्च न्यायालयाने दिलेले आहेत.

(२) व (३) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाच्या मंजुरीनुसार इमारतीची उंची अनुज्ञेय केलेली आहे. विमानतळ प्रभाव क्षेत्रामध्ये भारतीय विमान पत्तन प्राधिकरणाच्या मान्यतेने इमारतीची उंची अनुज्ञेय होते. याबाबत ते सक्षम प्राधिकरण आहे. सदर क्षेत्रामध्ये इमारतीची उंची निश्चित करणे अथवा त्यामध्ये शिथिलता देणेच्या शक्ती राज्य शासनास नाहीत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून कोणत्याही बांधकामासाठी परवानगी देण्याअगोदर संबंधित विमानतळ प्राधिकरणाकडून उंचीबाबत ना हरकत प्रमाणपत्र घेण्यात येते. त्याचप्रमाणे बांधकामासाठी परवानगी देण्यात येते व त्यामध्ये कुठलेही उल्लंघन आढळून आल्यास व विमान पत्तन प्राधिकरण/ नागरी उड्डाण संचालनालय यांच्याकडून महानगरपालिकेस कळविल्यास महानगरपालिकेकडून नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येते.

(४) व (५) प्रस्तुत प्रकरणी मा. उच्च् न्यायालयाचे आदेशानुसार एअरक्राफ्ट (डिमॉलिशन ऑफ ऑब्स्ट्रक्शन कॉज्ड बाय बिल्डींग ट्रीज ॲक्ट) रुल्स १९९४ अंतर्गत संचालक, नागरी उड्डाण संचालनायाकडून अंतिम कार्यवाही अभिप्रेत आहे.

-----------------

**भामरागड (जि.गडचिरोली) येथे नक्षलवाद्यांनी केलेला हल्ला**

**(५६) * ८७१४० श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.वैभव पिचड (अकोले), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.योगेश सागर (चारकोप), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील भामरागडमध्ये नक्षलवाद्यांनी एक बुलेटप्रूफ गाडी सुरुंगाने उडवल्याने एक जवान शहिद झाल्याचे तसेच २२ जवान जखमी झाल्याची घटना माहे मे, २०१७ च्या पहिल्या आठवड्यामध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जखमी जवानांवर उपचार करण्यास नागपूर येथील वर्धा रोड व धंतोली परिसरातील काही नामांकित रुग्णालयांनी नकार दिला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात मा.गृहराज्यमंत्री यांचेकडे तक्रार केल्यानंतर त्यांनी या प्रकरणी चौकशी करण्याचे निदेश संबंधितांना दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार जखमी जवानांवर उपचार करण्यास नकार देणा-या रुग्णालयांवर कारवाई करण्याबाबत तसेच नक्षली हल्ल्यात शहीद झालेल्या जवानाच्या कुटुंबियांना आर्थिक मदत व जखमींना औषधोपाचार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) गडचिरोली जिल्ह्यामध्ये नक्षलवाद्यांच्या हल्यामध्ये १ पोलीस जवान शहिद व २० पोलीस जवान जखमी झाले आहेत.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) मयत पोलीस कर्मचाऱ्यांच्या वारसदारांना सानुग्रह अनुदान व जखमी पोलीस कर्मचाऱ्यांना नुकसानभरपाई संदर्भात पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## 'सागर इन्व्हेस्टमेंट' मध्ये गुंतवणूक करणा-या गुंतवणुकदारांचे पैसे परत मिळण्याबाबत

**(५७) * ८५७०४ श्री.संजय पोतनीस (कलिना), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.भाऊसाहेब कांबळे**

**(श्रीरामपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अजय चौधरी (शिवडी), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूरसह कल्याण, डोंबिवली,ठाणे आणि महाराष्ट्रातील इतर महत्वांच्या शहंरामध्ये गत २८ वर्षापासून सुमारे ४ हजार गुंतवणूकदरांचे विविध गुंतवणूक योजनांच्या माध्यमातून ४०० कोटीहून अधिक रुपये घेऊन त्यांना बँकापेक्षा अधिक व्याज देण्याचे आमिष दाखवून गुंतवणुकीचा व्यवसाय करणा-या सागर इन्व्हेस्टमेंटच्या संचालकांवर माहे मे,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार सदर कंपनीच्या संचालकावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) तसेच, 'सागर इन्व्हेस्टमेंट' मध्ये गुंतवणूक करणा-या गुंतवणुकदारांचे पैसे परत मिळण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) असल्यास, प्रश्न भाग ३ व ४ बाबत कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) सदर गुन्ह्यातील ४ आरोपींनी संगनमत करुन सागर इन्व्हेस्टमेंट नावाच्या विना नोंदणी कंपनीमध्ये वार्षिक १८ टक्के रकमेचा परतावा देण्याचे आमिष दाखवून मुदत ठेवीची मुद्दल रक्कम व त्यावरील परतावा परत न करता फसवणूक केल्याबाबत दिलेल्या तक्रारीवरुन बदलापूर पोलीस स्टेशन (पूर्व) येथे गु.र.क्र. ६०/२०१७ भा.दं.वि. कलम ४०६, ४०९, ४२०, २०१, १२० (ब) सह कलम ३ महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असून सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विक्रोळी (मुंबई) येथील दांम्पत्याने नागरिकांची लाखो रूपयांची फसवणूक केल्याबाबत

**(५८) * ८६३६८ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रोळी (मुंबई) येथील हरियाली व्हिलेजमध्ये निलेश शहा ऊर्फ निलू जैन आणि त्याची पत्नी मनिषा सोरठिया या दांम्पत्याने डिवाईन फाऊंडेशन आणि ब्लू या संस्था स्थापन करून देणग्या गोळा करून हजारो नागरिकांची लाखो रूपयांची फसवणूक केली असल्याची माहिती दिनांक ११ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निर्देशनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गंभीर प्रकरणी विक्रोळी व पंतनगरच्या पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गंभीर प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळुन आले व तदनुसार शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२), (३) व (४) सदरहू प्रकरणी मुंबईतील विक्रोळी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १९१/२०१७, कलम ४२०, ३४ भा.दं.वि. अन्वये दि. ६.०७.२०१७ रोजी गुन्हा दाखल केला आहे.

सदर गुन्हयात दोन आरोपी निष्पन्न झाले असून अद्याप मिळून आले नाही. सदर गुन्हयांचा तपास सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहराला अधिक पाणीसाठा उपलब्ध करण्यासाठी उभारण्यात येणाऱ्या गारगई व पिंजाळा धरणाबाबत

**(५९) * ८६७९७ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहराला अधिकचा पाणीसाठा उपलब्ध करण्यासाठी उभारण्यात येणाऱ्या गारगई व पिंजाळा या धरणांमुळे पालघर जिल्ह्यातील तब्बल १२ चौ. किमी वनक्षेत्र पाण्याखाली जाणार असल्याचे माहे एप्रिल,२०१७ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पामुळे हजारहून अधिक आदिवासी कुटुंबे विस्थापित होणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर धरणांच्या कामामुळे नष्ट होणारे वनक्षेत्र तसेच विस्थापित आदिवासी कुटुंबाचे पुनर्वसन कुठे व किती कालावधीत करण्यात येणार आहे व सदर धरणांचे काम केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे,

(४) असल्यास, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) प्रस्तावित गारगाई धरणाच्या बुडीत क्षेत्रात सुमारे ७.२ चौ. किमी व पिंजाळ धरणाच्या बुडीत क्षेत्रात सुमारे ११.३ चौ. किमी असे एकूण १८.५ चौ.किमी इतके वनक्षेत्र पाण्याखाली जाणार आहे.

याबाबतचे वृत्त दिनांक २०.०४.२०१७ रोजी मुंबई मिरर व दिनांक २१.०४.२०१७ रोजी महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाले होते ही वस्तुस्थिती आहे.

(२) प्रस्तावित गारगाई व पिंजाळ प्रकल्पाच्या क्षेत्राच्या जनगणना सर्वेक्षणनुसार अनुक्रमे १९० व ८६५ अशी एकूण सुमारे १०५५ आदिवासी कुटुंबे विस्थापित होण्याची शक्यता आहे.

(३) प्रकल्पबाधित आदिवासी कुटुंबाचे पुनर्वसन करण्याबाबत तसेच बुडीत क्षेत्राखालील वनक्षेत्राबदली पर्यायी वनीकरणाबाबतचे प्रस्ताव बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत माहे डिसेंबर, २०१४ मध्ये जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे सादर करण्यात आला आहे.

(४) सदर प्रकल्पांसाठी आवश्यक असणाऱ्या विविध परवानग्या प्राप्त झाल्यानंतर गारगाई धरणाचे बांधकाम सन २०१८-१९ व पिंजाळ धरणाचे बांधकाम सन २०१९-२० मध्ये महानगरपालिकेमार्फत सुरु होणे अपेक्षित आहे.

-----------------

## नागपूरच्या आमदार निवासात अल्पवयीन मुलीवर झालेला लैंगिक अत्याचार

**(६०) * ८५२९५ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील सिव्हिल लाइन्समधील आमदार निवासामध्ये एका १७ वर्षीय मुलीवर दिनांक १४ ते १७ एप्रिल, २०१७ या काळात सामुहिक लैंगिक अत्याचार केल्याची घटना दिनांक २० एप्रिल, २०१७ रोजी निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केवळ आमदारांच्या निवासाची व्यवस्था असणा-या आमदार निवास गुन्हेगारीचा अड्डा झाला असून पैसे खर्च केल्यास कोणालाही खोली भाड्याने दिले जाते हे या घटनेतून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संपूर्ण घटनेची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व तद्नुसार आमदार निवासात आमदारांच्या शिफारशी पत्राविना इतर खासगी व्यक्तिंना कक्ष देणा-या जबाबदार असलेल्या व्यवस्थापक व अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत तसेच आमदार निवासाच्या सुरक्षेतेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच, सदर अत्याचारातील आरोपींवर कारवाई करण्याबाबत व पिडीत मुलीला आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, खरे आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) होय, चौकशी करण्यात आली आहे.

(४) सदर घटनेबाबत पोलीस स्टेशन गिट्टीखदान अप क्र. २१७/१७ कलम ३७६ (ड) ३४ भा.द.वि. सह कलम ३ ,४,६ पोक्सो प्रमाणे गुन्हा दाखल करून गुन्हयातील २ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. सदर गुन्हयाचा तपास सुरू आहे.

असा प्रकार पुढे घडू नये याकरीता सार्वजनिक बांधकाम विभागा मार्फत पुढील उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

१.अभ्यागताचे ओळखपत्राची छायाप्रत उपलब्ध केल्या शिवाय कक्ष दिला जाणार नाही.

२.संबधित शाखा अभियंता यांनी प्रत्येक दिवशी रजिस्टर मधील नोंदी व आरक्षित करण्यात आलेले कक्ष याची प्रत्यक्ष पडताळणी करावी व प्रत्येक आठवड्यात दोन वेळा उपविभागीय अभियंता यांनी सुध्दा पडताळणी करावी.

(५) मनोधेर्य योजने अंतर्गत पिडीत मुलीला बालकल्याण समितीकडून रू २.५० लाख इतकी आर्थिक मदत देण्यात आलेली आहे.

-----------------

## डॉ. नरेंद्र दाभोळकर व कॉ.गोविंद पानसरे यांच्या हत्येची चौकशीबाबत

**(६१) * ८४९४२ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ. नरेंद्र दाभोळकर यांची दिनांक २० ऑगस्ट, २०१३ रोजी व तद्नंतर कॉ. गोविंद पानसरे यांची दिनांक १६ फेब्रुवारी, २०१५ रोजी हत्या झाली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कॉ. गोविंद पानसरे यांच्या हत्येमध्ये वापरलेले पिस्तूल व डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या हत्येच्या वेळी वापरलेले पिस्तूल एकच असल्याचा अहवाल बेंगलोर फॉरेन्सिक लॅबने दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील घटनेमध्ये पिस्तूल जप्त केले असतांना पोलिस कस्टडीमधून बाहेर गेले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, डॉ.नरेंद्र दाभोळकर व कॉ.गोविंद पानसरे हत्या प्रकरणी शासनामार्फत सुरु असलेला तपास पूर्ण झाला आहे काय,

(५) असल्यास, तपासात काय आढळून आले व त्यानुसार सदर हत्या करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) कॉ.पानसरे यांच्या हत्येच्या गुन्ह्यात देशी बनावटीच्या दोन अग्निशस्त्रांचा वापर झाला असून, त्यापैकी एक अग्निशस्त्र डॉ.दाभोलकर यांच्या हत्येच्या गुन्ह्यात वापरण्यात आले असल्याबाबत बेंगलोर, कर्नाटक येथील तज्ञांचा अभिप्राय आहे.

(३) कॉ.गोविंद पानसरे यांच्या हत्येच्या गुन्ह्यात कोणतेही अग्निशस्त्र जप्त करण्यात आले नाही. डॉ.नरेंद्र दाभोळकर यांच्या हत्येच्या गुन्ह्याचा तपास सी.बी.आय. या तपास यंत्रणेकडून करण्यात येत आहे. सदर जप्त पिस्तुलाचा गुन्ह्यात वापर झाला किंवा नाही हा सी.बी.आय. या यंत्रणेच्या तपासाचा भाग आहे.

(४) व (५) डॉ.नरेंद्र दाभोळकर यांच्या हत्येच्या संदर्भात डेक्कन पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.१५४/२०१३, भा.दं.वि. कलम ३०२, ३४ शस्त्र अधिनियम ३ (२५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास दिनांक ३/६/२०१४ रोजी केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाकडे (सीबीआय) वर्ग करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस उप अधिक्षक, सीबीआय, स्पेशल क्राईम ब्रँच, नवी मुंबई हे करीत आहेत.

कॉ.गोविंद पानसरे यांच्या हत्येच्या संदर्भात कोल्हापूर जिल्ह्यातील राजारामपूरी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.३९/२०१५ भा.दं.वि. कलम ३०२, ३०७, १२० (ब), ३४ सह आर्म ॲक्ट ३(१)/२५ (१ब) (अ), ५ (२७) अन्वये गुन्हा दाखल झाला आहे. सदर गुन्ह्यामध्ये ४ आरोपींचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर

गुन्ह्यातील दोन आरोपींना अटक करुन त्यांच्याविरुद्ध मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार सदर कामी नियुक्त एस.आय.टी. मार्फत सी.आर.पी.सी. १७३(८) प्रमाणे चालू आहे. तसेच उर्वरित दोन आरोपींचा कसोशीने शोध घेण्यात येत असून त्यांच्याविरुद्ध रेड कॉर्नर नोटीस लागू करण्याची प्रक्रीया सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मानखुर्द, मुंबई येथे अंमली पदार्थ तस्कराला अंमली पदार्थासह अटक करण्यात आल्याबाबत**

**(६२) * ८५१०७ अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मानखुर्द नाक्यावर तस्कराला मेफेड्रोन (एमडी) नामक ८ किलो अंमली पदार्थासहित अटक केल्याची घटना माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या तस्कराचे संबंध असलेल्या कुरकुंभ (ता. दौंड, जि. पुणे) येथील औद्योगिक क्षेत्रातील सुजलाम केमिकल्स कंपनीवर छापा टाकला असता मुंबई पोलिसांकडून जप्त करण्यात आलेल्या अंमली पदार्थाची आंतराष्ट्रीय बाजारपेठेत १०० कोटी किमंत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, समर्थ लॅब नामक कंपनीमध्ये अशाच प्रकारचे अंमली पदार्थाचे अवैधरीत्या उत्पादन करून बाजारात विक्रीसाठी पाठवले जात असल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ वा त्या दरम्यान निदर्शनास आली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग २ व ३ मधील कंपनींवर कारवाई करण्याबाबत व अंमलीपदार्थावर नियंत्रण आणण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे. सदर छाप्यात १ किलो ५०० ग्रॅम मॅफेड्रॉन जप्त करण्यात आले असून त्याची अंदाजित किंमत रु.३० लाख इतकी आहे.

(३) समर्थ लॅब या कंपनीमध्ये अंमली पदार्थांचे अवैधरित्या उत्पादन करुन बाजारात विक्रीसाठी पाठविले जात असल्याची बाब माहे जानेवारी २०१७ किंवा त्या दरम्यान अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा मुंबई यांच्या निदर्शनास आलेली नाही. तथापि, माहे ऑगस्ट २०१६ मध्ये कस्टम्स विभाग, पुणे यांनी समर्थ लॅबोरेटरी येथे अंमली पदार्थ जप्त केल्याचे त्यांनी कळविले आहे.

(४) सद्यस्थितीत दोन्ही कंपन्या सिल करण्यात आले आहेत. पुणे ग्रामीण जिल्हा कार्यक्षेत्रातील औद्योगिक वसाहतीतील केमिकल कंपन्याची तपासणीची कारवाई करण्याबाबत संबंधित स्थानिक पोलीस स्टेशनला सूचना देण्यात आली आहे.

तसेच अंमली पदार्थ सेवनाचे प्रमाण कमी करण्याकरिता अंमली पदार्थ विरोधी कक्षातर्फे महाविद्यालयीन स्तरावर जानेवारी २०१५ पासून ड्रग्स फ्री कॅम्पस हा उपक्रम राबविण्यात येतो. सार्वजनिक गणेश उत्सव, नवरात्री, दहीहंडी अशा उत्सवात जनजागृती कार्यक्रम राबविले जातात. तसेच २६ जून हा अंमली पदार्थ विरोधी दिन म्हणून पंधरवडा साजरा करण्यात येतो यात अंमली पदार्थ व त्याचे दूष्परिणाम याबाबत विद्यार्थांना माहिती देणे, फिल्म दाखविणे, माहिती, चर्चासत्र, हॅडबिल वाटप व भिंती पोस्टरचे प्रदर्शन करणे. तसेच प्रचार फेऱ्या, मॅराथॉन, मोहल्ला कमिटी, पब्लिक मिटींग इत्यादी घेण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## नवी मुंबई येथे वन कॉईन या फायनान्स कंपनीने गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याबाबत

**(६३) * ८६७९८ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई येथे आंतरराष्ट्रीय स्तरावर ऑनलाईन गुंतवणूक करणाऱ्या वन कॉईन या फायनान्स कंपनीच्या १८ एजंटना माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान अटक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीकडे कोणत्याही प्रकारचे परवाने नसुन अद्यापपर्यंत सदर कंपनीने राज्य भरातील गुंतवणूकदारांची ५२ लाख ३६ हजार रुपयांची फसवणूक केल्याची गंभीर बाब निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कंपनीमार्फत राज्यातील सामान्य जनतेची भविष्यात आर्थिक फसवणूक होऊ नये म्हणून सदर कंपनीला राज्य भरात बंदी घातली जाणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्या अनुषंगाने सदर कंपनीच्या संचालकांवर गुन्हे दाखल करून कारवाई करण्याबाबत व फसवणूक झालेल्या जनतेचे पैसे परत मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करीत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) वनकॉईन / वनलाईफ ही कंपनी बल्गेरिया देशातील असून त्या कंपनीची भारत देशामध्ये कोणत्याही प्रकारचे कार्यालय, तसेच कंपनीच्या नावे बँक उपलब्ध नसून सदरची कंपनी भारत देशात अधिकृत प्राधिकरणाद्वारे नोंदणीकृत करण्यात आलेली नाही.

सदर प्रकरणी नेरूळ पोलीस ठाणे येथे गु.र.नं. १३२/२०१७ भादंवि कलम ४१५, ४२०,४०६,४०९, ३४ सह द प्राईझ चिटस ॲण्ड मनी सर्क्युलेशन स्किम (बॅनिंग) ॲक्ट १९७८ कलम ३, ४ सह माहीती तंत्रज्ञान अधिनियम सन २००० चे कलम ६६ (ड) अन्वये गुन्हा नोंद करून आतापर्यत २३ आरोपींना अटक करण्यात आली असून आरोपींनी गुंतवणूकदारांकडून गुंतवणूकीपोटी पैसे स्विकारण्याकरीता वापरण्यात आलेली संशयित ३२ बँक खाती (ज्यामध्ये सुमारे रू.२५ कोटी ची रक्कम आहे) गोठविण्यात आली आहेत. गुन्हा तपासावर आहे.

सदरची कंपनी ही केवळ त्यांचे कंपनीच्या वेबसाईटद्वारे कार्यरत असून सदरची वेबसाईट ब्लॉक करण्याकरीता विशेष पोलीस महानिरीक्षक, सायबर गुन्हे, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडून कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रिलायन्स इंडस्ट्रिजने करारानुसार काम पुर्ण न केल्यामुळे रु. १८० कोटींचा दंड वसूल करण्याबाबत**

**(६४) * ८५३०८ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे-कुर्ला संकुलातील वाणिज्यिक संकुल उभारण्यासाठी १ लाख ९४ हजार मीटर बोली रिलायन्सने लावून सदर काम माहे मार्च, २००७ पर्यंत पूर्ण करण्याचा करार राज्य शासन व एमएमआरडीएसोबत केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिलायन्स इंडस्ट्रिजने करारानुसार काम पुर्ण न केल्यामुळे रिलायन्स इंडस्ट्रिजला १८० कोटीचा दंड ठोठावण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दोन वर्षे होऊनही सदर दंड वसूल करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व सदर दंड वसूलीबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मे. रिलायन्स इंडस्ट्रिज लि. यांना वांद्रे-कुर्ला संकुलातील भूखंड क्र.सी ६४ हा संमेलन व प्रदर्शन केंद्र आणि वाणिज्य संकुल बांधण्याकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने वितरीत केला असून, त्याबाबतचा भाडेपट्टेकरार दिनांक ०१/०९/२००६ रोजी साक्षांकित नमूद केल्यानुसार सदर भूखंडावरील बांधकाम ४ वर्षात म्हणजेच दिनांक ३१/०८/२०१० रोजी पूर्ण करणे आवश्यक होते.

(२) सदर भूखंडातील बांधकाम अद्याप अपूर्ण आहे. परंतु, भुखंडाकरीता अतिरिक्त अधिमुल्याची व्याजासह भरणा करावयाची दिनांक १५/०७/२०१७ रोजी रक्कम रु. १३६९.९० कोटी इतकी आहे.

(३) मे. रिलायन्स इंडस्ट्रिज लि. यांनी सदर रक्कम अद्याप भरलेली नाही.
(४) व (५) याबाबतची कार्यवाही प्राधिकरणाच्या स्तरावर सुरू आहे

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.